मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ८ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०१९



## राष्ट्रीय क्रीडा दिन

# हसती दुनिया (मराठी)

अंक ८ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट २०१९

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर • आतिश चं. शिंदे
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३०
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०



## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- रवींद्रनाथ टागोर ०७
- मेजर ध्यानचंद-एक होता जादूगार १५
- वेगवेगळ्या देशाचे राष्ट्रध्वज २२
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -५८ ३४
- तेजस्विनी-८८ ३७
- स्वतंत्र्य दिनानिमित्त - १५ ऑगस्ट ४२
- आपले जिल्हे - वाशीम ४४
- पक्षीजगत ४७










## कथा


- लवणासुर संग्राम ०५
- मूर्खाशी वाद घालू नये ०८
- गुणांचे सौंदर्य १०
- हुशार ससा २०
- गुरुभक्ताचे प्रेम २१
- मानवतेचं झाड ३५
- बोले तैसा चाले ४८


## कविता


- मुक्ती पर्व ४३
- रक्षाबंधन ४५
- हसती दुनिया-अंतरंग ४९




# अनमोल वस्तूचे दान

विदेशातील ही घटना आहे. एक अतिशय धनाढ्य गृहस्थ होता. त्याच्याकडे खूप संपत्ती होती; परंतु त्याला मूलबाळ नव्हते. काही दिवसांनी त्याची पत्नीही वारली. एकाकी जीवन जगत असताना त्याने लोकांचं दु:ख-दैन्य अनुभवलं. विविध आजारांनी त्रस्त असलेले रोगीही पाहिले. एके दिवशी त्याने आपले मृत्युपत्र तयार केले. त्यात त्याने सर्व संपत्ती गोरगरीब आणि रुग्णांसाठी दान करुन टाकली. त्याच्याकडे आणखी एक अनमोल अशी वस्तू होती, ती म्हणजे त्याच्याकडे असणारी चारचाकी गाडी. अशी गाडी जगात कुणाकडेच नव्हती. अतिशय महागडी आणि अत्याधुनिक गाडीचे



मृत्युनंतर तो काय करणार आहे, याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली होती. त्याने आणखी एक मृत्युपत्र बनवले. त्यात त्याने अशी इच्छा व्यक्त केली होती, की आपल्या मृत्युनंतर गाडीचेही दफन करावे. ही गोष्ट जेव्हा वर्तमानपत्रातून लोकांना कळली, तेव्हा प्रत्येकजण हळहळला. लोकांनी त्याला मूर्ख आणि विक्षिप्त ठरवले. एवढी चांगली गाडी कोणाला देण्याऐवजी तिचा नाश करुन टाकावा, हे मूर्खपणाचे नाही का? एखाद्या गरजवंताला तरी ती द्यायला हवी असे प्रत्येकाला वाटू लागले. जगभरातून त्याला समजावण्याचा प्रयत्न केला गेला. ती गाडी अशीच सडून वाया जाण्यापेक्षा कोणाच्या तरी उपयोगी पडावी असेच सर्वांचे मत होते.

सर्वांची मतं ऐकल्यानंतर त्याने आपले निवेदन जगभरातील लोकांसाठी सादर केले. त्यात तो लिहितो, 'माझ्या हितचिंतकांनो, एक निर्जीव गाडी दफन करुन ती वाया जाऊ नये म्हणून प्रत्येक जण हळहळतोय; पण मित्रांनो, या गाडीपेक्षाही अतिशय महागडी वस्तू तुम्ही सारेजण वाया घालवत आहात. ती वस्तू म्हणजे तुमची बॉडी, तुमचा निर्जिव देह. तुम्ही मरण पावल्यावर तुमचा देह जमिनीत दफन केला जातो किंवा अग्नीत दहन केला जातो; पण जर त्याच देहाचे अवयव तुम्ही मरणोत्तर दान केले तर असंख्य गरजवंत रुग्णांना त्याचा लाभ होईल. आज जगामध्ये लाखो लोक अंध आहेत. तुमच्या नेत्रदानाने त्यांना नवीन दृष्टी मिळेल. तुमची त्वचा, यकृत, हृदय असे काही अवयव आहेत जे मृत्युनंतर लगेच काढून घेतले तर उपयोगात येऊ शकतात. आज तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण उत्तम गाड्या बनवू शकतो. त्याचे पार्ट बनवू शकतो; पण माणसाचे अवयव बनवू शकत नाही. मग ते अवयव माझ्या गाडीपेक्षा किमती आहेत की नाही? म्हणून जीवंतपणी रक्तदान आणि मरणोत्तर नेत्रदान किंवा देहदान आपण करायला नको का?'

मित्रांनो, त्या विचित्र, विक्षिप्त वाटणाऱ्या व्यक्तीचे हे विचार खरोखरच विचार करायला लावणारे आहेत की नाही? १३ ऑगस्ट हा दिवस नेहमीप्रमाणे 'जागतिक अवयव दान दिन' म्हणून केवळ रिवाज म्हणून साजरा न करता अवयव दानाची जागृती आपण निर्माण करायला हवी की नाही?

माता सविंदर हरदेवजींच्या आदेशानुसार असंख्य निरंकारी मिशनच्या भक्तांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केलेला आहे.

- राजेंद्र थोरात





पौराणिक कथा

# लवणासुर संग्राम

लीला नावाच्या राक्षसीचा ज्येष्ठ पुत्र मधू राक्षस. त्याने घोर तपश्चर्येने भगवान शंकरांना प्रसन्न करुन घेतले. भगवान शंकरांनी आपल्या त्रिशूलातून एक चमचमणारा परमशक्तिशाली शूल मधू राक्षसाला दिला व म्हटले, "जोपर्यंत तू ब्राह्मण व देवांच्या विरुध्द जात नाहीस, तोपर्यंत हा शूल तुझ्यापाशी राहील, अन्यथा अदृश्य होईल. हा शूल तुझ्या शत्रूला भस्मसात करुन परत तुझ्या हाती येईल!"

त्यावर मधूराक्षस महादेवांना प्रणाम करुन म्हणाला, "हा शूल वंशपरंपरेने माझ्याकडे राहावा."

महादेव म्हणाले, "तसं होणार नाही, परंतु तुझी विनवणी लक्षात घेता मी वर देतो, की तुझ्या एका पुत्रापाशी हा शूल राहील आणि तो पुत्र त्याच्या साऱ्या



शत्रूंना पराभूत करील.”

मधुराक्षसाची पत्नी महाभागा कुंभिनसी. कुंभिनसीला एक पुत्र झाला. त्याचे नाव लवण. तो फार उद्धट आणि दुष्ट होता. त्याचे वागणे मधुराक्षसाला अजिबात आवडत नव्हते. पुढे मधुराक्षस समुद्रात राहायला निघून गेला. जाताना त्याने आपला शूल जो महादेवांनी त्याला दिला होता तो आपल्या पुत्राला म्हणजे लवणाला दिला. त्या शूलाच्या प्रभावाने लवणासुर उन्मत्त झाला. देव, असुर, ऋषी-मुनी, तपस्वी सर्वांनाच तो त्रास देऊ लागला. शेवटी त्याचा नाश करावा म्हणून सारे ऋषी-मुनी श्रीरामांपाशी गेले.

श्रीरामांनी लवणासुराची सर्व माहिती मिळवली. लवणासुर हा नरभक्षकच नाही तर सगळ्या प्राणी-पक्ष्यांना खाणारा आहे. मधुवनातील प्राणी-पक्षी-माणसं-राक्षसं कुणालाच तो सोडत नाही, सगळ्यांना खात सुटतो.

श्रीरामांनी आपल्या सर्व बंधुना एकत्र बोलावून लवणासुराचा बंदोबस्त करण्याविषयी विचारविनिमय केला. त्यावर भरत म्हणाला, “भ्राताश्री, लवणाच्या वधाची जबाबदारी माझ्यावर सोपवा.” त्यावर शत्रुघ्न म्हणाला, “रघुनाथा, महाबाहू भरताने यापूर्वी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. यावेळी ही संधी मला द्यावी. भ्राता भरताला अधिक कष्ट देऊ नयेत.”

श्रीराम संतुष्ट होत म्हणाले, “बंधू शत्रुघ्ना, तू पापात्म्या लवणासुराचा वध करुन तिथल्या राज्यावर राज्य कर. मी स्वतः तुझा राज्याभिषेक करीन. तू अस्त्र-शस्त्र विद्येचा ज्ञाता आहेस, तुझ्या ठायी नवीन नगर वसविण्याची शक्ती आहे.”


त्यावर शत्रुघ्न अतिशय नम्रपणाने म्हणाला, “हे अयोध्यापती, भ्राता भरतासारखे ज्येष्ठ बंधू असताना माझ्या अभिषेकाचा विषय नसावा.”

श्रीरामांनी शत्रुघ्नाला युध्दविषयक सल्ला देत त्याच्या हाती एक दिव्य बाण देत म्हटले, “भगवान शिवाने दिलेला एक दिव्य शूल लवणासुराकडे आहे. तो त्या शूलाला जपून ठेवतो. परंतु जेव्हा तो भुकेलेला असतो तेव्हा भक्ष्य शोधण्यासाठी बाहेर पडताना त्याच्याजवळ शूल नसतो. तेव्हा त्याला युध्दासाठी आव्हान दे.” श्रीरामांच्या सल्ल्यानुसार शत्रुघ्न आपली सुसज्ज सेना घेऊन निघाला. पावसाळा सुरु होईपर्यंत शत्रुघ्नाला पोचायचे होते. वाटेत वाल्मिकी ऋषींचा आश्रम लागला. तेथे एका जागी प्राचीन काळी झालेल्या यज्ञ सोहळ्याचे अवशेष दिसत होते. ते पाहिल्यावर शत्रुघ्नाच्या मनात त्याविषयी जाणून घेण्याची इच्छा झाली. तेव्हा त्या यज्ञाची हकीकत वाल्मिकी ऋषींनी त्याला ऐकवली ती अशी .....

क्रमशः



# रवींद्रनाथ टागोर



७ मे १८६१ ला रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म कलकत्त्यातील (आताचे कोलकाता) श्रीमंत व प्रख्यात कुटुंबात झाला. महर्षी देवेंद्रनाथ टागोर हे त्यांचे वडील तर शारदादेवी ह्या त्यांच्या आई. विविध शाळांमधून व शिक्षकांकडून रविंद्रनाथांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. ॲकॅडेमीमध्ये त्यांनी भारतीय इतिहास व संस्कृती या विषयाचे अध्ययन केले. युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन येथे एक वर्ष कायदे शिक्षणाचे धडे घेतले. वयाच्या ८व्या वर्षापासून त्यांनी कविता करण्यास सुरुवात केली. वयाच्या १७व्या वर्षी त्यांचा एक कवितासंग्रह प्रकाशित झाला. १८८३ मध्ये मृणालिनीदेवी रायचौधरी यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. १८९३ ते १९०० या काळात त्यांनी ७ विविध कवितासंग्रह लिहिले.


१९०१मध्ये त्यांनी कलकत्त्याबाहेर शांतिनिकेतन येथे 'विश्वभारती'ची स्थापना केली. यामध्ये पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञान व शिक्षणाचे धडे दिले जात. १९२१ला विश्वभारती शाळेचे विश्वभारती युनिव्हर्सिटीत रुपांतर झाले. पुस्तकं, कविता, ग्रंथ, कथा, तज्ज्ञांचे प्रबंध, भारतीय इतिहासावरील लिखाण या विविध माध्यमांतून मुलांना इथे घडवलं जात होतं. १९१३मध्ये टागोर यांना त्यांच्या साहित्यामधील उत्कृष्ट योगदानासाठी नोबेल पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. जवळपास दोन वर्षांनी त्यांना सर ही पदवी ब्रिटिश सरकारने बहाल केली. परंतु १९१९ मध्ये अमृतसर येथे झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ त्यांनी ती परत केली.

आपल्या कथांमधून मानसशास्त्र व वास्तविकता यांची सांगड घालणारे टागोर तत्कालीन पहिले भारतीय साहित्यिक ठरले. चोकरबाली (१९०३) व नष्टानीर (१९०१) हे त्यांचे नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणारे लिखाण अत्यंत लोकप्रिय ठरले. १८९१ ते १८९५ या काळात त्यांनी ४४ बंगाली लघुकथांचे लिखाण केले. त्यातील बहुतांशी कथा 'साधना' मासिकातून प्रसिद्ध झाल्या होत्या. अध्यात्म व मानवीप्रेम यांचा आर्तभाव असणाऱ्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानंतर अमेरिकेत व इंग्लंडमध्ये रवींद्रनाथ टागोर यांची ख्याती सर्वत्र पसरली.

रवींद्रनाथ टागोर यांची बरीचशी विचारसरणी ही उपनिषदांच्या शिकवणीवर आणि 'आत्मिक शुद्धी व इतरांची सेवा यातच देव आहे' या त्यांच्या स्वत:च्या विश्वासावर आधारित होती. आंतरराष्ट्रीय मूल्य व

(पान ९ वर)





कथा :

# मूर्खाशी वाद घालू नये

एकदा सम्राट अकबर बिरबलाला म्हणाला, "बिरबला, माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दे."

बिरबल म्हणाला, "जहांपनाह! काय प्रश्न आहे तुमचा ?" अकबर म्हणाला, "प्रश्न असा आहे की जर मूर्ख लोक भेटले तर बुध्दिमान लोकांनी काय करायला हवे ?"

बिरबल म्हणाला, "प्रश्न थोडासा विचित्र आणि कठीण आहे. मला विचार करण्यासाठी थोडासा वेळ द्या, तरच मी तुमच्या प्रश्नाचे योग्य उत्तर देऊ शकेल." असे बोलून बिरबल घरी निघून गेला.

घरी जाताना बिरबलाला रस्त्यामध्ये एक हमाल भेटला. बिरबलाने हमालाला स्वत:कडे बोलवले व तो म्हणाला, "तू खूप गरीब दिसतो आहेस. उद्या तू माझ्याबरोबर सम्राट अकबराच्या दरबारात ये. मी तुला खूप पैसे मिळवून देईन. जेणेकरुन तुला सुखाचे



आयुष्य जगता येईल."

बिरबल हमालाला घरी घेऊन आला. त्याचा आदराने पाहुणचार करुन त्याला रात्रभर ठेवून घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला उठविले. त्याला जेवण दिले आणि नंतर त्याला पंडिताचा वेश घालून अकबराच्या दरबारात घेऊन गेला. बिरबलाने रस्त्यामध्ये हमालाला समजावले. "दरबारात तुला कोणताही प्रश्न विचारला तरी शांत राहा. कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देऊ नकोस. जर उत्तर दिले तर तुला शिक्षा होईल," असे म्हणून ते दोघंही अकबराच्या दरबारात पोहोचले.

दरबारात बिरबलाला पाहून अकबराने विचारले, "बिरबला, माझ्या प्रश्नाचं उत्तर आणलंस का ?"

बिरबलाने उत्तर दिले, "हो महाराज, मी या पंडिताला माझ्याबरोबर घेऊन आलो आहे. तोच तुमच्या प्रश्नाचं योग्य उत्तर देईल."

अकबराने लगेच पंडिताला प्रश्न विचारला, "पंडितजी, तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दे." पंडिताचा वेष धारण केलेला हमाल शांत बसला. अकबराने पुन्हा विचारल्यानंतरही पंडित शांत बसला. अकबराला राग आला. त्याने बिरबलाला विचारले, "बिरबल, पंडित माझ्या प्रश्नाचं उत्तर का देत नाही ? शांत का बसला आहे ?"

बिरबलाने उत्तर दिले, "महाराज, पंडिताने शांत राहून तुमच्या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे; पण तुम्हाला ते समजलं नाही. पंडिताच्या शांत राहण्याचा अर्थ असा आहे की मूर्खांच्या सान्निध्यात बुध्दिमान लोकांनी शांत राहावे. त्यामध्येच बुध्दिमान लोकांचा फायदा आहे." अकबराला बिरबलाच्या बोलण्याचा हेतू समजला आणि त्याने बिरबलाला कधीही असा प्रश्न विचारला नाही.

❖❖❖

## रवींद्रनाथ टागोर (पान ८ वरुन)

एकतेची जाणीव यांनी परिपूर्ण असणाऱ्या नव्या जगाच्या संकल्पनेस त्यांनी अधिक प्रोत्साहन दिले. १९१६ ते १९३४च्या दरम्यान त्यांनी जगभर प्रवास केला. १९१६, १९२७ मध्ये त्यांनी पूर्व आशियाई देशांमध्ये त्यांच्या लिखाणातून व व्याख्यानांमधून पूर्व व पाश्चिमात्य देशांच्या एकत्रिततेवर भर दिला. रवींद्रनाथ टागोर लिखित 'जन-गण-मन' हे गीत भारताचे, तर 'Our Golden Bengal' हे बांग्लादेशाचे राष्ट्रगीत झाले.

अशा या थोर साहित्यिकांच्या अपूर्व साहित्यपर्वाचा अंत ७ ऑगस्ट १९४१ रोजी वयाच्या ८०व्या वर्षी झाला. साहित्यसेवेसच आपले आयुष्य बहाल करणारे व त्यातच असीम आनंद मानणारे रवींद्रनाथ टागोर विश्वकल्याण, एकता व शांतीचे स्वप्न साकारण्यास सतत प्रयत्नशील राहिले व त्यांच्या या कार्यप्रणालीतून त्यांनी अवघ्या विश्वाला जणू काही संदेश दिला...

I slept and dreamt that life was joy,
I awoke and saw that life was service,
I acted and behold, service was joy!!!


❖❖❖

**मनामध्ये नेहमीच आभार मानण्याची अशी भावना राहिली पाहिजे, की हे प्रभू! जे काही मला प्राप्त झाले आहे, ही तुझी कृपा आहे. जर तू काहीच दिले नसतेस तर मी दुसऱ्याला काय दिले असते?**

**ज्ञान आणि दागिने लपवून ठेवल्याने त्याची किंमत आणि तेज नष्ट होते.**

**- बाबा हरदेव सिंहजी महाराज**





# गुणांचे सौंदर्य

कथा

मगध सम्राट चंद्रगुप्त आणि आचार्य चाणक्य एकदा बागेत गप्पा गोष्टी करत फेरफटका मारत असताना त्यांच्या बाजूने राज्यातील एक सुंदर युवती निघून गेली. चंद्रगुप्तांनी ती सुंदर युवती पाहिल्यावर चाणक्यांची चेष्टा करावी या हेतूने एक प्रश्न विचारला, "आचार्य तुम्ही सुंदर असता तर?"

चाणक्य म्हणाले, "मी सुंदर असलो काय, नसलो काय, शेवटी माणसाची ओळख गुणांनी होते, रुपाने नव्हे."

चंद्रगुप्त म्हणाले, "हे कसं शक्य आहे? तुम्ही मला एखादं उदाहरण देऊन पटवून देऊ शकाल? जिथे गुणासमोर रुप फिकं पडेल?" चाणक्य म्हणाले, "वेळ आल्यावर अवश्य पटवून देईन."

राजवाड्यात गेल्यानंतर चाणक्यांनी राजा चंद्रगुप्तांना दोन ग्लास पाणी पिण्यास दिले. चंद्रगुप्त पाणी प्यायल्यानंतर आचार्यांना म्हणाले, "पहिल्या पेल्यामधलं पाणी सोन्याच्या सुरईतलं होतं आणि दुसऱ्या पेल्यामधलं पाणी मातीच्या माठातलं होतं. तुम्हाला कोणतं पाणी छान वाटलं?"

चंद्रगुप्त म्हणाले, "मातीच्या माठातलं." जवळच उभी असलेली चंद्रगुप्तांची महाराणी या उदाहरणाने प्रभावित झाली आणि म्हणाली, "मग ती सुंदर सोन्याची सुरई काय कामाची, जी तहान भागवू शकत नाही? माठ कसाही असला तरी तहान माठातल्या पाण्यानेच भागते. म्हणजेच रुप नाही, गुण महान असतो, नाही का आचार्य?"

आचार्यांनी हसून चंद्रगुप्ताकडे पाहिलं. चंद्रगुप्त समजला, आचार्यांनी आपल्या प्रश्नाचं अचूक उत्तर दिलय.

मित्रांनो, माणसाला त्याच्या रुपामुळे नाही तर गुणामुळे सन्मान मिळतो. रुप आज आहे उद्या नाही; परंतु गुण तर माणूस जिवंत असेपर्यंत असतात आणि माणसाच्या मृत्यूनंतरही गुण जिवंत असतात. म्हणून प्रत्यकाने सद्गुणांचा संग्रह करण्यासाठी सतत गुणग्राहक बनले पाहिजे.

– नितिन ल. घुरुप, रायगड



# दादाला विचारु या

प्रश्न : आपली जर कोणी निंदा करत असेल, आपलं नुकसान करत असेल, आपल्याशी वाईट वागत असेल तर अशा वेळी आपण काय करावे ?

उत्तर : कुणाच्याही निंदेचा, दुर्व्यवहाराचा आपल्यावर परिणाम होऊ देऊ नये. त्या गोष्टींची प्रतिक्रीया व्यक्त करु नये. त्या व्यक्तीला जे करायचं ते करु दे. त्याच्याविषयी क्रोध, वैर-द्वेषाची भावना आपल्या मनात येऊ नये; परंतु हे कसं शक्य आहे ? कोणी वाईट बोललं तर राग येणारच. त्याचा बदला घ्यावा असं वाटणारच. परंतु सद्‌गुरुकडून ज्यांनी 'नामधन' घेतलेले आहे, त्यांना नामस्मरणाचे कवच अशा गोष्टींच्या प्रभावापासून दूर ठेवण्यास मदत करते. त्यामुळे या गोष्टींबाबत दु:खी न होता; दुर्व्यवहार करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रार्थना करावी, की त्यांना सुमती लाभावी, सुबुध्दी द्यावी. त्यांच्याविषयी दया, करुणा बाळगावी. आपल्या अंत:करणातील सद्‌भाव, प्रार्थना यामुळे त्यांच्या हृदयाचे हळूहळू परिवर्तन होत जाईल. जसे, अग्नीने अग्नी विझत नाही, तसे वैराने-वैर मिटत नाही. एवढे करुनही जर त्या व्यक्तीत सुधारणा होत नसेल तर प्रभु-परमात्मा योग्य तो न्याय करतोच करतो. आपल्या पुत्रावर झालेला अन्याय कुठलीही माता सहन करु शकत नाही, तसे आपल्या भक्तावर झालेला अन्याय हा प्रभु-परमात्मा खपवून घेत नाही.

❖❖❖❖❖❖


प्रश्न : संत निरंकारी मिशनच्या मान्यतेनुसार देवी-देवतांची पूजा अर्चा का केली जात नाही ?

उत्तर : समाजात देवी-देवतांची पूजा-अर्चा का केली जाते ? ईश्वरप्राप्तीसाठी ? मोक्षप्राप्तीसाठी ? नाही. आमची तनाची-मनाची-धनाची दु:खं दूर व्हावीत. संसारात आम्हाला कुठल्याच गोष्टींची कमतरता पडू नये यासाठी लोक पूजा-अर्चा, नवस-सायास करतात. देवी-देवता त्यांना प्रसन्न झाल्या तर त्यांच्या या भौतिक इच्छा पूर्ण करतात. परंतु देवी-देवतांचे सामर्थ्य, त्यांना मिळालेली शक्ती ही या निराकार प्रभुकडूनच त्यांना प्राप्त होते. म्हणजे सर्वांना देणारा दाता केवळ एक प्रभु-परमात्मा निराकार आहे. निरंकारी मिशनमधल्या भक्ताने याच निराकार प्रभु-परामात्म्याची प्राप्ती केल्यामुळे तो या एकाशिवाय कोणाकडेच काही मागत नाही. तसं पाहिलं तर अशा या ब्रह्मज्ञानी भक्ताला सांसारिक पदार्थांच्या इच्छा-वासना उरत नाहीत. तो मुक्त असतो. त्यामुळे त्याला देवी-देवतांची पूजा करण्याची आवश्यकताच उरत नाही. उलट प्रभु-परमात्म्याच्या प्राप्तीमुळे त्याला देवी-देवतांपेक्षाही श्रेष्ठ दर्जा प्राप्त झालेला असतो.

❖❖❖❖❖❖



# विचारपुष्प



आज मानव एकता दिनी एका बाजुला बाबा गुरबचनसिंहजी यांचे नाव येते तिथे दुसऱ्या बाजूला चाचा प्रतापसिंहजी यांचीही चर्चा होते. त्यांनी कशाप्रकारे तो सेवाभाव आयुष्यभर धारण केला. आरामाची पर्वा न करता क्षणोक्षणी गुरुला काय हवे आहे ते पाहिले. अशा काही गोष्टी आहेत ज्या डोळ्यांतील भाव जाणून स्वतःच जागरुक राहून काय केले पाहिजे ते स्वतः करत असत किंवा सेवादलाच्या माध्यमातून करत असत. तेव्हा, बाबा गुरबचनसिंहजी यांचे तेही रुप आपण पाहिले, त्यांची अशी शिकवण होती की, आजही आपण सेवादल वर्दी परिधान करतो तेव्हा अभिमान वाटतो. कारण ही वर्दी अशा महान हस्तींनी परिधान केली. बाबा हरदेवसिंहजी यांनी स्वतः परिधान केली, चाचा प्रतापसिंहजी यांनी घातली तसेच अनेक अशा महापुरुषांनी परिधान केलेली वर्दी आमच्या भाग्यात आली आहे. तेव्हा ती सेवा आमच्यासाठी कितीतरी महत्वपूर्ण आणि केवढीतरी जबाबदारीची आहे. याबरोबरच बाबा गुरबचनसिंहजी यांचे जीवन आपण पाहिले तर त्यांनी हीच शिकवण दिली की, जर आगीत तेल ओतले तर ती आणखी भडकणारच ती



विझवण्यासाठी पाणी हेच एक साधन आहे. मग आपण आपल्या जीवनात केवळ द्वेषच करायचा आहे का? केवळ अशीच कामे करायची आहेत का, की, जी आमच्या मनाला वेदना देतील आणि इतरांवर त्यांचा जो प्रभाव पडेल तो नुकसानकारक असेल? आपण ते करायचे आहे, की आपल्या जीवनात मानवी मूल्यांचा अंगीकार करुन पुढे जायचे आहे?

ही बाब अगदी स्पष्ट आहे की, आपण प्रेम, विशालता, नम्रता, सद्‌भावपूर्ण एकत्वाचा भाव आपल्या अंतरात धारण करुन आपल्या जीवनपथावर अग्रेसर व्हायचे आहे कारण जो उजेड (ज्ञानाचा) आपल्याला मिळालेला आहे तो केवळ स्वत:पर्यंत सीमित ठेवण्यासाठी मिळालेला नाही. ज्ञान घेतले म्हणजे सर्व पूर्ण झाले असे नव्हे. आपले जीवनदेखील ज्ञानाप्रमाणे असावे. जो कोणी आपल्या संपर्कात येईल त्याला भेटून हा ज्ञानरुपी प्रकाश प्रयत्नपूर्वक त्याच्यापर्यंत पोचवायचा आहे.

जर आपण असा विचार करत असू की, आम्ही आपले योगदान कसे द्यावे; तर बाब इतकीच आहे जी आज इथे व्यासपीठावरुन कथन केली गेली आणि दासीनेही थोड्यावेळापूर्वी म्हटले की, बाबा गुरबचनसिंहजींचा जो संदेश होता तो आपण आपल्या जीवनात धारण करायचा आहे. तसे आचरण, तो साधेपणा, तो नशापानाच्या त्यागाचा भाव धारण करून गृहस्थाश्रमात राहून भक्ती करायची आहे, सत्संगामध्ये आपण जे ग्रहण करतो ते आपल्या जीवनात, आपल्या कर्मांमध्ये त्या सगळ्या भावना उतरायच्या आहेत याविषयीचा तो संदेश होता. ते नेहमी एक उदाहरण देत असत. ज्या विद्यार्थ्याने पूर्ण वर्षभर अभ्यास केला आहे, अध्यापकाची सर्व लेक्चर ऐकली आहेत त्याची अचानक परीक्षा घेतली तरी तो तयार असेल. तथापि, जो नेहमी शाळेला दांडी मारतो त्याच्यासमोर अशा आकस्मिक परीक्षेचा विषय काढला तर तो घाबरणारच. आपल्याला कसा विद्यार्थी बनायचं आहे ते आपल्यावरच आहे. जर जीवनात अशी स्थिती आली जो आमच्या परीक्षेचा क्षण असेल तर आपण घाबरून जाणारे विद्यार्थी बनू नयेत; तर जे काही आहे ते या निराकाराचे आहे. निराकाराकडूनच शिकवण घेतली आहे आणि जीवनात हीच शिकवण पुढे घेऊन जाणार, असा विद्यार्थी असू? कसाही प्रसंग असो आपण कसोटीवर खरे उतरायचे आहे. स्वत:शी प्रामाणिक राहून तेच पुढे प्रस्तुत करायचे आहे.


❖❖❖



# शब्दकोडे

## १८९

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## आडवे शब्द

१. जागतिक फोटोग्राफी दिवस ऑगस्ट महिन्याच्या ..... तारखेला साजरा करतात.

४. पृथ्वीचे आयुष्य साडेचार .... वर्षे मानले जाते

५. ..... हा नाग चावल्याने राजा परीक्षित मरण पावला.

६. प्रसिध्द पर्यटन स्थळ शिमला आणि मनाली ..... प्रदेशात आहेत.

७. पाण्याचं घनरुप

८. शरीरात एक अवयव; जिथे अन्न घुसळले जाते

१०. मालेगाव, कारंजा, मानोरा हे तालुके या जिल्ह्यात आहेत

१३. न जुळणारा शब्द : गाजर, मुळा, बीट, पेरु

१५. देशाच्या भौगोलिक मध्यावर असलेले शहर कोणते ?

१६. दहा तोंडे असलेला

## उभे शब्द

२. नागालँडची राजधानी

३. ..... या नदीकिनारी लुधियाना शहर वसले आहे (सतलज/गोदावरी)

४. दीन-ए-इलाही नावाचा धर्म स्थापन करणारा मुघल बादशहा

६. तिरंगा ध्वजातील तिसरा रंग

९. ..... महाठक (म्हण)

११. मेघालय राज्याची विधानसभा ..... या शहरात आहे.

१२. ज्येष्ठ पांडव युधिष्ठिरच्या मातेचे नाव

१३. कळ लावणारे एक प्रसिध्द पौराणिक पात्र

१४. वारा, वात, वायू

१५. मुलाची मुलगी

उत्तरे इतरत्र







# मेजर ध्यानचंद एक होता जादूगार

'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून २९ ऑगस्ट हा दिवस भारतात साजरा केला जातो. १९२८, १९३२ आणि १९३६ साली भारतीय हॉकी संघाला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवून देणारे खेळाडू ध्यानचंद सिंग यांचा हा जन्म दिवस. ध्यानचंद यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केला जातो. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी इलाहाबाद येथे झाला. त्यांचे वडील समेश्वर सिंग हे ब्रिटिश भारतीय सेनेत होते. ध्यानचंद यांनी त्यांच्या १९२६ ते १९४८ सालापर्यंतच्या क्रीडा कारकिर्दीत ४०० हून अधिक गोल्स केले. लहान वयात ध्यानचंद यांना खेळाबद्दल विशेष आकर्षण नव्हते मात्र त्यांना कुस्ती आवडत असे. पुढे रांची येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांना खेळाबद्दल रस निर्माण होऊ लागला. वयाच्या १६व्या वर्षी ते भारतीय लष्करात भरती झाले.

१९३६ साली ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघाने जर्मनीच्या हॉकी संघाला पराभूत केले. त्यानंतर हिटलरने ध्यानचंद यांची सर्वोत्तम कामगिरी पाहून त्यांना जर्मनीच्या लष्करात येण्याची विचारणा केली होती. परंतु ध्यानचंद यांनी त्यासाठी स्पष्ट नकार दिला. ध्यानचंद यांच्या कारकिर्दीतील सुवर्णपदकाच्या कमाईनंतर भारत हॉकीमध्ये प्रभावशाली संघ म्हणून ओळखला जाऊ लागला. १९५६मध्ये भारत सरकारने ध्यानचंद यांना भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान मानला जाणारा पद्मभूषण प्रदान केला.

आंतरराष्ट्रीय हॉकीच्या मैदानावर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवून त्यांनी आपल्या देशालादेखील गौरवाच्या शिखरावर पोचवले. राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवर त्यांनी आपल्या कामाचा सुवर्ण ठसा उमटवला. ध्यानचंद यांच्या सन्मानार्थ त्यांच्या नावाने भारतीय क्रीडा क्षेत्रातील अत्यंत मानाचा मानला जाणारा जीवनगौरव पुरस्कार मेजर ध्यानचंद पुरस्कार म्हणून दिला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिवसाचे औचित्य साधून दरवर्षी राष्ट्रपती भवनात देशाचे राष्ट्रपती देशातील सर्वोत्तम खेळाडूंना राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कार आदी पुरस्काराने सन्मानित करतात.

❖❖❖






# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा




मुसळधार पावसामुळे साऱ्या वस्तीत पाणीच पाणी झाले. काही अस्वलं झाडावर चढली तर काही आपला जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागली.
पाण्याचा जोर इतका होता की, चिकू आपल्या आईवडिलांचा हात सुटल्याने पाण्यातून वाहत गेला.
सकाळी पाऊस कमी झाला. सर्वांना हायसे वाटले. प्रत्येकजण आपापल्या नातेवाईकांचा शोध घेऊ लागले. सर्वजण मिळाले परंतु त्यात चिकूचा पत्ता नव्हता.




चिकू वाहत जाऊन एका झाडीमध्ये अडकला होता.
तो मदतीसाठी ओरडत होता. इतक्यात चंपू माकड आले आणि त्याने चिकूला बाहेर काढले.
चिकूने चंपूला धन्यवाद दिले आणि म्हणाला, ‘माझ्याबरोबर घरी चल. उद्या माझा वाढदिवस आहे, आपण खूप मजा करुया.’
चंपू म्हणाला, “ठीक आहे” दोघेही उड्या मारत निघाले.


इकडे चिकूची आई चिकूची वाट पाहत होती. तिचा विश्वास होता की चिकू परत येणार.
चिकू घरी येताच त्याच्या आईवडिलांना खूप आनंद झाला.
चिकूने आपल्या मित्राची सर्वांना ओळख करुन दिली, आणि सर्वांनी चंपूचेही आभार मानले.
दुसऱ्या दिवशी चिकूचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. सर्व अस्वलांनी आणि माकडांनी धमाल केली आणि चिकूला भरपूर शुभकामना दिल्या.
तात्पर्य : मुलांनो, संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात द्या आणि मित्र जोडा.

कथा

# हुशार ससा



एका समुद्रात दोन बेटं होती. एक बेट निर्जन होतं. दुसऱ्या बेटावर मात्र सशांची संख्या जास्त होती. एकदा सशांना सहल काढायची लहर आली. सगळे ससे एका होडीत बसले आणि शेजारच्या निर्जन बेटावर पोहचले. तिथे दिवसभर खेळून सारे होडीतून पुन्हा आपल्या बेटावर परतले. पण एक चिमुकला ससा मात्र वाट चुकला आणि त्या निर्जन बेटावरच अडकला. त्या बेटावर खाण्याची चंगळ होती तरीही ससा दुःखी होता. कारण त्या संपूर्ण बेटावर तोच एकटा ससा होता. आपल्या बेटापर्यंत त्याला जाता येत नव्हते. कारण मध्ये खोल समुद्र होता. सशाने एक दिवस खूप खूप विचार केला. त्याच्या डोक्यात एक युक्ती आली. तो धावत समुद्राच्या काठावर गेला तेथे एक मगर राहात होता. रोजच्याप्रमाणे आजही तो वाळूवर आराम घेत होता. ससा भीत भीत त्याच्याजवळ गेला आणि म्हणाला, 'मगरदादा आपण मगरींचे राजे आहोत असं सर्वांना सांगता पण मला ते खरंच वाटत नाही. कारण राजाभोवती त्याचे दरबारी, मानकरी, शिपाई आणि प्रजा असते; पण आपण तर एकटेच दिसता.'

चिमुकल्या सशाचे ते बोलणे ऐकून तो म्हणाला, 'उद्या मी माझ्या साऱ्या प्रजेला घेऊन येथे येतो. या समुद्रात पाच हजार मगरी राहतात व साऱ्या माझ्या आज्ञेत आहेत.'

ससा हसून म्हणाला, 'अस्सं, तर मग उद्या याचवेळी याच ठिकाणी सर्वांना घेऊन या.' दुसऱ्या दिवशी ससा समुद्रकाठी येऊन पाहतो तर तेथे जमलेल्या असंख्य मगरी पाहून त्याला खूप भीती वाटली. 'ये चिमुकल्या मित्रा' मगर राजा म्हणाला, 'ही पहा माझी प्रजा – मोजून पहा हवी तर.'

'मोजतो की! या साऱ्यांना एका रांगेत उभे राहायला सांग.' मगरराजाने हुकूम सोडला व साऱ्या मगरी एका रांगेत उभ्या राहिल्या. तसा ससा एका मगरीवरुन दुसऱ्या मगरीवर उड्या मारीत चालू लागला. एक-दोन, दहा-वीस, पन्नास, शंभर, हजार असे मोजता मोजता संध्याकाळ झाली. शेवटच्या मगरीच्या पाठीवरुन उडी मारुन ससा आपल्या बेटावर पोहचला.

'चिमुकल्या मित्रा, झालं का तुझं समाधान' मगरराजा गर्वाने म्हणाला.

'होऽऽ' असं म्हणून ससा खोऽखो हसू लागला.


'तू असा हसतोस का?' मगर राजाने रागाने विचारले. ससा म्हणाला, "मगरदादा, मी त्या बेटावर एकटा होतो, खूप दिवसांपासून इथे यायचा विचार करीत होतो म्हणून मी ही युक्ती केली. पण खरंच मगरदादा, मला क्षमा कर. माझ्याकडे दुसरा उपायच नव्हता. तू मला जी मदत केलीस, त्याबद्दल तुझे खूप खूप आभार."

सशाच्या हुशारीवर मगरदादासह सगळे मनापासून हसले. त्यांचा निरोप घेत ससा आनंदाने आपल्या कळपात परतला.

❖❖❖



# गुरुभक्ताचे प्रेम



बाऊ महादेवसिंहजी, संत निरंकारी मिशनमधील महान गुरुभक्त होते. आपला-परका हा भेद तर त्यांच्यासाठी संपल्यातच जमा होता. संतांच्या प्रेमात ते सद्गुरुचं प्रेम आणि संतांच्या सेवेत सद्गुरुच्या सेवेचा आनंद घेत असत.

१९७०ची गोष्ट आहे. बाऊजी प्रचार यात्रेसाठी विदेशात गेले होते. एकदा रात्री ते संत जोगिंदर मंडलजींच्या घरी मुक्कामासाठी राहिले. जेवता जेवता मंडलजींचं लक्ष त्यांच्या अंगठीकडे गेलं. ते सहज भावनेने म्हणाले, "बाऊजी, तुमची अंगठी फार सुंदर आहे." हे ऐकताच बाऊजींनी आपल्या बोटातील अंगठी काढून मंडलजींना भेट म्हणून देऊन टाकली. ती अंगठी ते परत करु लागले, तेव्हा बाऊजी म्हणाले, "एका अंगठीमुळे जर एखाद्या गुरुभक्ताला आनंद प्राप्त होत असेल तर हा सौदा महाग नाही. गुरुभक्तीमध्ये तर शीर देऊन जरी सद्गुरुचं प्रेम आणि आशीर्वाद मिळाला तरी तो गुरुसिख भाग्यशालीच आहे."

गुरुभक्ताला आपला गुरुबंधू नेहमी सद्गुरुसारखाच वाटतो. सद्गुरुची सेवा तो ज्या समर्पित भावनेने करतो तशीच सेवा तो गुरुबंधूचीही करत असतो. आपल्या गुरुबंधूमध्ये गुरुचं रुप पाहतो. हीच भावना सद्गुरुला प्रिय असते. जसं, भावंडांमधील प्रेम पाहून माता-पिता सुखावतात तसं गुरुबंधूंचे एकमेकांवरील प्रेम पाहून सद्गुरुही प्रसन्न होतो. गुरुला प्रसन्न करण्याचा हाच खरा राजमार्ग आहे. बाऊजींसारखा त्याग-समर्पण आपण करु शकलो नाही तरी, निदान आपल्या गुरुबंधूना आपण आदराने वागवू शकतो, त्यांच्याशी स्वच्छ-प्रामाणिक व प्रेमाचा व्यवहार तर करु शकतो.

गुरुभक्त हा गुरुबंधूंमध्ये कधीही भेदभाव करत नाही. सर्वांमध्येच गुरुचं रुप पाहतो. हा आपला तो परका असा भाव त्याच्या मनी कधी येत नाही. गुरु ज्याप्रमाणे समदृष्टीने पाहतो, गुरुच्या नजरेत कुणी लहान-मोठा, आपला-परका नसतो, तसं गुरुभक्ताच्याही नजरेत कुणी लहान-मोठा नसतो. तो गुरुच्या नजरेने पाहतो, गुरुच्या कानांनी श्रवण करतो. कुणाचे अवगुण न पाहता केवळ गुणच पाहतो. आणि तेच गुण धारण करतो. अशी ही अवस्था गुरुभक्तांची असते. संत निरंकारी मिशनमध्ये असे अनेक गुरुभक्त होऊन गेले. त्यांची जीवनचरित्रे 'संत निरंकारी मिशनचे ज्योतिस्तंभ' या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात.

- रंजना भांगरे, मुलुंड



# वेगवेगळ्या देशांचे राष्ट्रध्वज



## भारत :

आपला राष्ट्रध्वज तीन रंगांचा आहे. म्हणून त्याला तिरंगा असे म्हटले जाते. तिरंग्यामध्ये तीन रंग आहेत - केसरी, सफेद आणि हिरवा. त्यावर मधोमध निळ्या रंगाचे अशोक चक्र आहे. केसरी रंग साहस आणि बलिदानाचं प्रतीक आहे, सफेद रंग शांतीचे प्रतीक आहे तर हिरवा रंग हरित पर्यावरणाचे प्रतीक आहे. अशोक चक्र हे सत्याचे दर्शक आहे तर त्यातील २४ आरे हे २४ तासांचे प्रतीक आहे.

## पाकिस्तान :

पाकिस्तानचा झेंडा हिरव्या रंगाचा आहे. हा हिरवा रंग इस्लाम धर्माचे प्रतीक आहे. या व्यतिरिक्त त्यावरील चंद्र हा प्रगती, प्रकाश आणि ज्ञानाचे प्रतीक आहे.





## अमेरिका :

अमेरिकेच्या झेंड्यामध्ये लाल आणि सफेद रंगाच्या १३ रेषा आहेत. या १३ रेषा त्या कॉलनींच्या प्रदर्शक आहेत ज्या ब्रिटीश राज्यापासून वेगळ्या झाल्या आणि त्यातूनच अमेरिकेचे गठन झाले. याशिवाय या झेंड्यावर वरच्या डाव्या बाजुला निळ्या रंगाचे जे चौकोन आहेत त्यामध्ये सफेद रंगांचे ५० स्टार (तारे) आहेत, ते अमेरिकेतील ५० राज्ये दाखवतात.

## बांगलादेश :

बांगला देशाचा ध्वज हिरव्या रंगाचा असून त्याच्या मधोमध लाल रंगाचे वर्तुळ आहे. हिरवा रंग समृध्दी आणि शांती-सुखाचे तर लाल रंगाचा गोळा सूर्याचे प्रतीक आहे. सूर्य हेच सांगतो की, सदोदित पुढे जात रहा.








**कॅनडा :**

कॅनडाचा झेंडा Maple Leaf नावाने ओळखला जातो. यातील लाल रंग जागतिक युध्दात शहीद झालेल्यांना श्रध्दांजली अर्पित करत आहे तर सफेद रंग शांतीचे प्रतीक आहे. या झेंड्याच्या मधोमध एक पान आहे, त्याला ११ टोके आहेत. हे मैपल लीप (पान) कॅनडाची राष्ट्रीय ओळख सांगते.

**श्रीलंका :**

श्रीलंकेच्या झेंड्याला सिंहाचा झेंडा म्हटले जाते. या झेंड्यातील पिवळा रंग हा बौध्द धर्माचे प्रतीक आहे, नारंगी रंग श्रीलंकेतील तामिळी लोक आणि हिरवा रंग मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करतो. यामध्ये सिंह तलवार घेऊन उभा आहे, ते देशाच्या शौर्याचे प्रतीक आहे. या झेंड्यावर चार लहान लहान पानेही आहेत जी प्रेम, आनंद, दया आणि सद्भावाचे प्रतीक होत.





**नेपाळ :**

नेपाळचा झेंडा जगातील एकमेव असा झेंडा आहे जो चौकोनी नाही. या झेंड्यामध्ये लाल रंगाचा वापर सर्वाधिक करण्यात आलेला आहे. ते शौर्याचे प्रतीक आहे. वरील भागात चंद्र आणि खाली सूर्य आहे. झेंड्याच्या भोवताली निळ्या रंगाची पट्टी आहे जी शांतीचे प्रतीक आहे.

प्रस्तुती : जगतार 'चमन'
(अनुपगड, राजस्थान)




# मोड आलेली धान्ये आरोग्यदायक

आपण आपल्या कुटुंबियांसाठी अंकुरलेल्या म्हणजेच मोड आलेल्या धान्यांचा वापर कराल, तर त्यांचे व आपले आरोग्य सुधारेल. हे वैविध्यपूर्ण मोड व्हिटॅमिन 'ए', 'बी', 'डी', 'ई' व 'जी' चा अनमोल स्त्रोत आहेत. तसेच यातून कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, सोडियम, पोटॅशियम व सिलिकॉनही मिळते. दैनंदिन जीवनात याचा वापर सलाद, सूप व सॅण्डविचमध्ये करु शकता. पाहू या काही अंकुरलेल्या धान्यांचे गुण.

**मोडाचे गुण -** हे वर्षभर उपलब्ध असतात. हे स्वादिष्ट, क्रंची असून, आजारानंतरचा अशक्तपणा दूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. हे पचण्यास अत्यंत हलके असतात. आजारी व्यक्तीला याचे सूप द्यावे. तसेच हे कच्चे, शिजवून वा सलादात मिसळूनही खाता येतात.

**मोडाचे काळे हरभरे -** हे व्हिटॅमिन 'बी' कॉम्प्लेक्सचा उत्तम स्त्रोत आहेत. रात्री भिजवून सकाळी जांभळाच्या मधासोबत खाल्ल्यास हे नैसर्गिक टॉनिकप्रमाणे काम करतात. मोडाच्या चण्याचे पाणी ग्लुकोजचा उपयोग वाढवतात, जो मधुमेहासाठी विशेष



सहाय्याक असतो. हा आयर्नचाही उत्तम स्त्रोत आहे. त्याचा वापर कटलेट, सलाद, सूप व रस्सा भाजीत करता येतो.

**मोडाचे गहू -** खपली गव्हाचे मोड अत्यंत आरोग्यदायी असतात. कारण त्यात खपली व गव्हाचे 'बी'ही असते. हा व्हिटॅमिन 'बी', आयर्न, झिंक, फॉस्फरस, पोटॅशियम व फायबरसोबत अनेक पौष्टिक




घटकांचा स्त्रोत आहे. जेव्हा गव्हांना मोड आणले जातात तेव्हा त्यात व्हिटॅमिन, मिनरल व फायबरचे प्रमाण वाढते. ते गहू जास्त पाचक बनवतात. ॲलर्जी असणाऱ्यांसाठी हे उत्तम खाद्य पदार्थ आहे. यापासून स्वादिष्ट सलाद बनवता येतात. तसेच कोणत्याही भाजीत वापरता येतात.

**मोडाचे सातू -** हा ॲण्टी ऑक्सिडेंट व व्हिटॅमिन 'बी'-१ चा चांगला स्त्रोत आहे. हा हृदयविकार व कॅन्सर रोखण्यास मदत करतो. सर्दी-पडसे, खोकल्यापासून रक्षण करण्यासाठी प्रभावी आहे. याचा वापर सॅलड व भाज्यांची चव वाढविण्यासाठी करता येतो.

❖❖❖



# हातांवरील आसन




## कोनासन

या आसनामध्ये दोन्ही हातांच्या पंजांवर आणि पायांच्या टाचांवर शरीर संतुलित केले जाते. त्या वेळी शरीराचा आकार भूमितीमधील कोनासारखा दिसतो. म्हणून या आसनास 'कोनासन' असे म्हणतात.

कृती : पाय समोरील बाजूस सरळ रेषेत ताठ ठेवा. त्यानंतर चित्रात दाखविल्याप्रमाणे हाताचे पंजे मागे न्या. हात ताठ ठेवा. आता श्वास आत खेचून हातांच्या पंज्यांच्या व टाचांच्या मदतीने शरीर वर उचला. मान मागील बाजूस वाकवा. दोन्ही हात सरळ ठेवा आणि छाती वर आकाशाच्या दिशेस ठेवा. या आसनस्थितीत आठ ते दहा सेकंदांपर्यंत राहा. नंतर हळूहळू मूळ स्थितीत या. हे आसन चार ते सहा वेळा करु शकाल.

फायदे : १) या आसनाच्या नित्य सरावामुळे खांदे मजबूत बनतात व पोटाच्या तक्रारी दूर होतात.

२) या आसनामुळे पायाला व मेरुदंडास चांगल्या प्रकारे व्यायाम मिळतो.


३) हे आसन पश्चिमोत्तानासनाचे उप-आसन असल्याने पश्चिमोत्तानासनानंतर केल्यास अत्यंत फायदेशीर होते.

❖❖❖

## तोलासन

या आसनास बकासनाचा एक प्रकार समजण्यात येतो. या आसनास 'तुलितासन' असे देखील म्हणतात.

कृती : प्रथम बकासनाचा पहिला प्रकार करा. आसनाच्या शेवटी पायाचे चवडे बकासनाच्या पहिल्या प्रकाराप्रमाणे हातांच्या कोपरांखाली न टेकवता, चित्रात दाखविल्याप्रमाणे दोन हातांच्या मध्यभागी, पण दोन्हींत थोडे अंतर राखून ठेवा. म्हणजे तोलासनाची स्थिती साधेल. बाकीची सर्व क्रिया बकासनाप्रमाणे करावी. या आसनाचा वेळ हळूहळू वाढवत पंधरा मिनिटांपर्यंत न्यावा.



फायदे : १) या आसनामध्ये दोन भ्रुकुटींमध्ये नजर वारंवार स्थिर करावी लागत असल्याने डोळ्याचे सामान्य विकार या आसनाने दूर होतात.

२) बकासनामुळे होणारे सर्व फायदे या आसनामुळे देखील प्राप्त होतात.

३) उत्थित पद्मासनामुळे जे रोग बरे होतात, ते सर्व रोग या आसनामुळे देखील बरे होतात. उत्थित पद्मासनापासून प्राप्त होणारे सर्व फायदे या आसनाच्या नित्य सरावाने देखील प्राप्त होतात.

❖❖❖



# वाढदिवसाच्या



स्वना जाधव



आनंदिता रावत



अन्वेश निकम



हर्ष धाडवे



अनिशा बामणे



एकता राऊत



निधी पाटील



अंश रावत



गार्गी सुतार



निधी गोरे



निहारिका शिंगणापूरे



# हार्दिक शुभेच्छा


प्रतिक यादव


रोहित शिंपी


सवेरा जाधवानी


श्राव्या देशमुख


ओम वाडेकर


श्रावणी हेगडे


श्रेया पाटील


तनीश पाटील


साई ढोबळे


श्रावणी गवळी


स्मरणीका पवार





# केळवे पाणकोट

**किल्ल्याचा प्रकार : जलदुर्ग**

**जिल्हा : ठाणे**

केळवे पाणकोट किंवा केळवे जंजिरा या नावाने ओळखला जाणारा हा किल्ला केळवे गावाच्या दक्षिणेला भर समुद्रात आहे. दांडा खाडी ज्या ठिकाणी समुद्राला मिळते, त्याच मार्गावरील खडकावर या किल्ल्याची उभारणी भर समुद्रात केल्यामुळे दांडा खाडीवर व समुद्रावर एकाचवेळी नियंत्रण ठेवणे पोर्तुगिजांना सहज साध्य झाले. जहाजाच्या आकाराचा हा सुंदर पण अपरिचित पाणकोट आजही सुस्थितीत उभा आहे. ओहोटीच्या वेळी अलिबागच्या कुलाबा किल्ल्याप्रमाणे समुद्राचे पाणी किल्ल्याच्या पाठीमागे जाते त्यामुळे जमीन उघडी पडते व खुष्कीच्या (जमिनीच्या) मार्गाने किल्ल्यावर जाता येते.

**इतिहास :**

पोर्तुगिजांनी हा पाणकोट बांधला होता. पोर्तुगिज मराठे युध्दाच्या वेळी (फेब्रुवारी १७३९) चिमाजी आप्पांना लिहीलेल्या पत्रात या किल्ल्याची नोंद आढळते.

**पहाण्याची ठिकाणे :**

किल्ला बांधतांना स्थापत्यकाराने किल्ल्याचे प्रवेशद्वार जमिनीपासून ८ फूट उंचीवर बांधलेले आहे. त्यामुळे भरतीच्यावेळी समुद्राच्या पाण्याने जेव्हा किल्ला वेढला जातो तेव्हा बोटीने किल्ल्यात प्रवेश करता येतो; तर ओहोटीच्या वेळी किल्ल्याच्या आजूबाजूची जमीन उघडी पडल्यावर ८ फूट भिंत चढून किल्ल्यात प्रवेश करावा लागतो. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस जंग्या आहेत, तसेच तोफा ठेवण्यासाठी झरोके आहेत. प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस दरवाजा मागील अडसर लावण्यासाठी दगडात खाच केलेली आहे.



प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर समोर दुसरे प्रवेशद्वार व त्याच्या बाजुची तटबंदी दिसते. तटबंदीत जंग्या आहेत. पहिला दरवाजा पडल्यावरही किल्ला लढविण्यासाठी ही रचना केलेली आहे. दुसऱ्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर डाव्या हातास उद्ध्वस्त वास्तूचे अवशेष व कोरडा पाण्याचा तलाव दिसतो. येथून पुढे गेल्यावर तिसरे प्रवेशद्वार लागते. किल्ल्याचा हा भाग दोन मजली असून त्याचा आकार अर्धवर्तुळाकार आहे. आतमध्ये पाण्याची बुजलेली विहीर आहे. अर्धवर्तुळाकार तटबंदीमध्ये दोनही मजल्यावर जागोजागी जंग्या व तोफांसाठी झरोके आहेत. तसेच लाकडी वासे लावण्यासाठी तटबंदीत केलेल्या खाचा दिसतात. या झरोक्यांचा उपयोग तोफा ठेवण्याबरोबरच व्यापारी नौकांकडून जकात वसूलीसाठी (आजच्या टोल नाक्यांप्रमाणे) केला जात असावा.

### पोहोचण्याच्या वाटा :

पश्चिम रेल्वेवरील केळवे स्थानकात उतरुन, बस अथवा रिक्षाने (८ किमी) केळवे गावातील चौकात यावे. या चौकातून डाव्या हाताचा रस्ता दांडा खाडीमार्गे भवानगडाकडे जातो. या रस्त्यावर चौकापासून ५ मिनिटावर कस्टमची इमारत व कस्टमचा किल्ला आहे. या इमारतीकडून उजव्या हाताचा रस्ता केळवे कोळीवाड्याकडे जातो. कोळीवाड्यातून ओहोटीच्यावेळी चालत किल्ल्यापर्यंत जाता येते. किल्ल्याचे प्रवेशद्वार जमिनीपासून ८ फूट उंचीवर आहे. लाटांच्या घर्षणामुळे अंदाजे ५ फूटावर तटबंदीत खाच तयार झालेली आहे. या खाचेत चढून किल्ल्यात प्रवेश करता येतो.

### राहण्याची व जेवणाची तसेच पाण्याची सोय :

किल्ल्यावर राहण्याची व जेवणाची तसेच पाण्याची सोय नाही. पण केळवे गावात होऊ शकते.

### जाण्यासाठी लागणारा वेळ :

केळवे गावातून चालत १५ मिनीटात पाणकोटपर्यंत जाता येते.

### सूचना :

भवानगड (१५ किमी), दांडा किल्ला, फुटका बुरुज, कस्टम किल्ला (१५ किमी), केळवे पाणकोट (१५ किमी), केळवे भुईकोट (३ किमी), माहिमचा किल्ला (५ किमी) व शिरगावचा किल्ला हे सर्व किल्ले एका दिवसात पाहून होतात. परंतु यासाठी समुद्राच्या भरती ओहोटीची वेळ माहित असणे फार महत्वाचे आहे. कारण केळवे पाणकोट केवळ ओहोटीच्या वेळी पहाता येतो. ओहोटीची वेळ पाहून व्यवस्थित नियोजन केल्यास सर्व किल्ले एका दिवसात आरामात पहाता येतात. पालघर किंवा केळवेहून दिवसभरासाठी ६ आसनी रिक्षा मिळू शकते.

जर ओहोटी सकाळी असेल तर प्रथम केळवे पाणकोट पहावा. नंतर दांडा किल्ला, भवानगड पाहून परत केळवेत यावे. जेवण करुन केळवे भुईकोट, माहिमचा किल्ला, शिरगावचा किल्ला पाहून पालघरला जावे.

ओहोटी संध्याकाळी असल्यास पालघर स्थानकात उतरुन रिक्षा करुन ५ किमी वरील शिरगाव, ५ किमी वरील माहिमचा किल्ला व महकावती देवीचे मंदीर, ४ किमी वरील केळवे भुईकोट, ३ किमी वरील भवानगड पाहून शेवटी परत केळवे गावात येऊन ओहोटीला केळवे पाणकोट पहावा व ८ किमी वरील केळवे स्थानक गाठावे.

❖❖❖



# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न : तापमापक म्हणजे काय? त्याचा शोध कोणी व केव्हा लावला?

उत्तर : शरीराचे तापमान मोजावयाचा थर्मामीटर तुम्ही सर्वांनी पाहिला असेलच. खरेतर थर्मामीटर म्हणजेच तापमापकाचा वापर वेगवेगळ्या रुपात वेगवेगळे तापमान मोजण्यासाठी होत असतो. उदाहरणार्थ वातावरणाचे तापमान मोजण्यासाठी, खोलीचे तापमान मोजण्यासाठी, उकळत्या पाण्याचे वा बर्फाचे तापमान मोजण्यासाठी इ.

थर्मामीटरचा शोध इटलीचे प्रसिध्द शास्त्रज्ञ गॅलिलिओ यांनी इ.स. १५९३ साली लावला. सर्वप्रथम त्यांनी हवेचे तापमान मोजण्याचा थर्मामीटर शोधून काढला. हा थर्मामीटर काचेच्या नळीचा सूक्ष्म छिद्र असणारा होता. यामध्ये अल्कोहोल भरलेले होते. थर्मामीटरवरील स्केल कळण्यासाठी या अल्कोहोलमध्ये लाल रंग मिसळलेला असे. हा द्रवपदार्थ उन्हाळ्यात विस्तारत व हिवाळ्यात आकसत असे. हा थर्मामीटर वातावरणाचे तापमान समजण्यासाठी भिंतीवर लटकवून ठेवता येतो.

या थर्मामीटरवरुन प्रभावित होऊन १७२४ साली ग्रबियल फॅनहाइट या जर्मन शास्त्रज्ञाने शरीराचे तापमान मोजण्याचा थर्मामीटर तयार केला. या थर्मामीटरला त्याचेच नाव देण्यात आले. या थर्मामीटरमध्ये पाणी गोठण्याची पातळी ३२ डिग्री व उकळण्याची पातळी २१२ डिग्री होती.

आजकाल पाऱ्याचे थर्मामीटर खूप प्रचलित व उपयुक्त आहेत. पारा उन्हाळ्यात प्रसरण व हिवाळ्यात आकुंचन पावतो, या आधारावर हे उपकरण तयार केले गेले. जर अंगात ताप असेल, तर जास्त उष्णतेने पारा प्रसरण पावून नेमक्या ठिकाणी थांबतो. याउलट ताप नसेल, तर सामान्य शरीराच्या तापमानावर स्थिर रहातो.

इतर अनेक प्रकारचे थर्मामीटर औद्योगिक क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अनेक यंत्रांमध्ये वापरले जातात. हे थर्मामीटरही तापमानच दाखवतात पण यांचे काम वेगळे असते. काही धातूंचे थर्मामीटरही कारखान्यांत वापरले जातात. काही थर्मामीटर त्यांना जोडलेल्या लांब पेन्सिलने तापमानाची नोंदही करीत असतात.

❖❖❖❖❖❖

प्रश्न : स्कूबा डायव्हिंग म्हणजे काय?

उत्तर : स्कूबा डायव्हिंग म्हणजे समुद्राच्या पाण्यात डोके बुडवून पाण्यातील समुद्राचे आणि समुद्रतळाचे सौंदर्य पाहणे.

डायव्हिंग सूट : स्कूबा डायव्हिंग करण्यासाठी डायव्हिंग सूट घालावा लागतो. थंड पाण्यापासून संरक्षण मिळावे यासाठी तो घालावा लागतो. हा ड्रेस घट्ट असल्याने पाणी शिरुन ड्रेस जड होत नाही.

डायव्हिंग मास्क : डोळ्यांच्या संरक्षणासाठी व पाण्यात स्पष्ट दिसण्यासाठी मोठा चष्मा म्हणजे डायव्हिंग मास्क घालावा लागतो.

स्नॉर्कल : डायव्हिंग मास्कला ग या आकाराची बारा इंच लांबीची नळी असते. या नळीला स्नॉर्कल असे म्हणतात. याचे एक तोंड पाण्याच्या थोड्या वर असते आणि दुसरे स्नॉर्कलिंग करणाऱ्याच्या तोंडात असते. या नळीच्या सहाय्यानेच तोंडाने श्वास घेता येतो.

स्वीमफिन : बदकाच्या पंजासारखे असलेले बूट म्हणजे स्वीमफिन होय. पाण्यात उतरल्यावर पाणी ढकलायला या स्वीमफिनचा चांगला उपयोग होतो.

प्रशिक्षक : तुम्हाला जर स्कूबा डायव्हिंग करायचे असेल आणि जर पोहोता येत नसेल तर तुमच्या सोबत प्रशिक्षक दिला जातो.

❖❖❖❖❖❖



# उत्साहाच्या जोडीला संयमाची आवश्यकता



तरुण मुलं जेव्हा वयोवृध्दांकडे बघतात, तेव्हा त्यांच्या मनात एक अशा प्रकारची ऊर्मी जागृत होते की आपणही ह्या ज्येष्ठांच्या कामाला हातभार लावावा. त्यांच्यासमोर आलेल्या अडीअडचणी सोडवायला मदत करावी, आपलेही योगदान त्यात असावे. अशा वेळी त्यांना झिडकारु नये, त्यांना आडकाठी करु नये त्यांच्या उत्साहावर पाणी फिरवू नये. वयोवृध्दांचे हेच कर्तव्य असते की अशा वेळी कार्यात अधिकाधिक पुढे येण्याची त्यांना प्रेरणा द्यावी. त्यांच्या मनात जोश-जोम जागवावा, उत्साह द्विगुणित करावा. हा उत्साह प्रेमानेच जागवावा, फुलवावा. एखाद्याच्या कामात काही जरी उणीव राहिली, कमतरता असली तरी त्याला प्रेमाने समजवावे.

कोणत्याही महापुरुषाच्या ह्रदयात तरुणांविषयी तुच्छ भाव किवा हीन भाव नसावा. कारण आपण लहानांकडूनच काही गोष्टी चांगल्याप्रकारे शिकत असतो. संतजन तर चांगलं मिळेल तिथून ग्रहण करायला तत्पर असतात. तरुणांकडूनही त्यांचे गुण ग्रहण केले पाहिजेत. याचबरोबर लहान बालकांनी आणि तरुणांनीसुध्दा ज्येष्ठ आणि वयस्कांविषयी चुकीच्या आणि हिणकस भावना ठेवू नयेत. त्यांनी मनात एकच ध्यान ठेवावे की आपल्याला ज्येष्ठांकडून त्यांच्या अनुभवातून शिकायचे आहे, त्यांच्या छत्रछायेत राहायचं आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मनात एक उच्च भाव हवा की, आपण संत आहोत. आपण मिळून मिसळून मिशनचे कार्य करायचे आहे. मिशनचा प्रचार करायचा आहे. गुरुचे आदेश मानायचे आहेत. सर्वप्रथम हाच निश्चय हवा, हेच ध्यान हवे, हाच विचार हवा. मगच आपले जे काही कार्य आहे, काम आहे ते करायचं आहे आणि सत्संग, सेवा आणि स्मरणात, परमार्थाच्या कामात चढाओढीने सहभाग घ्यायचा आहे. संतजनहो, हीच भावना मनात ठेवून तरुणांनी अग्रेसर व्हायचं आहे आणि वयोवृध्दांना आपला हातभार लावायचा आहे, पूर्ण सहयोग घ्यायचा आहे. कार्यात काही उणीवा भासल्या, कमतरता दिसून आली तर त्यात सुधारणा व्हावी म्हणून दातार प्रभु काही ना काही व्यवस्था करतोच, ज्याजोगे साऱ्या कमतरता - उणीवा विरुन जातात.

(साभार - गुरुवचन (मराठी))





# हसा मुलांनो हसा

गुरुजी - पिंट्या, 'बेचिराख करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांग.

पिंट्या - बे चा पाढा एका कागदावर लिहून तो जाळल्यास जी राख तयार होते, तिला 'बेचिराख करणे' असे म्हणतात.

---

गुरुजी - बन्या, हल्ली रोज शाळेत उशीरा का येतोस ?

बन्या - गुरुजी, ताईच्या सासरची माणसं आली होती.

गुरुजी - अरे मग काय झालं ? त्यांनी सांगितलं रोज उशीरा जा म्हणून ?

बन्या - तसं नाही... आईने त्यांच्यासाठी कोंबडा कापला.

गुरुजी - म्हणजे आईने पाहुणचार केला... पण त्याचा इथं काय संबंध ?

बन्या - गुरुजी, तोच कोंबडा सकाळी बांग द्यायचा आणि मग आम्ही उठायचो.

---

लीलाकाकू हातामध्ये हातोडी घेऊन तावातावाने शाळेत आल्या.

शिपाई - ओ काकू, कुठं निघालात ?... कुणाला भेटायचंय ?

काकू - मला आधी त्या देशमुख मास्तरांचा वर्ग कुठे आहे ते सांग ?

शिपाई - (घाबरत) का... काय झालं ?

काकू - ते माझ्या शैल्याचे क्लास टिचर आहेत.

देशमुख सर : (हेडमास्तरांच्या मागे लपत) सर, सांभाळा हो या बाईला !

हेडमास्तर : हे बघा बाई, थोडं शांततेने घ्या. एकदम हातघाईवर येऊ नका.

काकू - अहो, शांततेने घ्या म्हणजे काय ? रोज पोराच्या पँटी फाटताहेत, म्हटलं आज सोक्षमोक्षच लावून टाकते.

हेडमास्तर - म्हणजे तुम्ही करणार तरी काय ?

काकू - ही हातोडी घेऊन आधी त्या बेंचचा खिळा नीट ठोकणार. पोराच्या तीन नव्या पँटी त्या खिळ्याला अडकून फाटल्या.






आई - मग काय, विन्या. आता पैसे मिळाल्यावर काय करायचं ठरवलंय? बंगला घ्यायचा की बँकेत फिक्समध्ये ठेवायचे?

विन्या - अगं आई, मला आणि पैसे? कसले पैसे मिळणार मला?

आई - अरे, आताच आयपीएल मॅच संपली ना! चांगली करोडोने कमाई होतेय म्हणे!

विन्या - अगं, ते करोडो रुपये खेळणाऱ्या खेळाडूंना आणि आयोजकांना मिळणार, मला नाही काही!

आई - मग, कॉलेजला दांड्या मारुन तासन तास टी.व्ही. समोर डोळे फाडून बसायचा. ह्याला शिव्या दे... त्याला शिव्या दे. आदळआपट कर. कधी मोठ्याने ओरडायचा, शिट्या वाजवायचा हे सारं कशासाठी? चल, मुकाट्यानं अभ्यासाला बैस.

सरिता वहिनी - अहो, माझा पिंट्या ना सारखा तोंडात बोटं घालत असतो. काय करावं तेच कळत नाही.

रुपाली वहिनी - अहो, हे तर काहीच नाही माझा बंटी तर दोन्ही हातांची बोटं तोंडात घालायचा...

सरिता वहिनी - मग काय उपाय केला तुम्ही?

रुपाली वहिनी - काही नाही... फक्त त्याला सैल पँट घालून दिली. कमरेवरुन पँट खाली सरकू नये म्हणून तो सारखी दोन्ही हाताने वर ओढत असतो. त्यामुळे त्याला तोंडात बोटं घालताच येत नाही.

डॉक्टर - (ऑपरेशन थिएटरमध्ये) घाबरु नका देशपांडे... खूप छोटं ऑपरेशन आहे...

पेशंट - थँक्यू डॉक्टर... पण माझं नाव देशपांडे नाही.

डॉक्टर - मला माहीत आहे हो... देशपांडे माझंच नाव आहे... पण माझं हे पहिलंच ऑपरेशन आहे ना!





समर्थ दर्शन : भाग - ५८

# देगावच्या पाटलाला शिक्षा

समर्थांनी शिष्यांना प्रत्येक शेतातील हुरड्याची पाच-पाच कणसं घेऊन एके ठिकाणी बसून खायला सांगितले. त्याप्रमाणे पाटलांच्या शेतातील विहिरीजवळ बसून सारे हुरडा भाजून खात असल्याचे पाहून देगावच्या पाटलाने रागारागाने समर्थांच्या पाठीवर तीन फटके मारले. त्यांच्या पाठीवरचे वळ पाहून शिवराय म्हणाले, देगावच्या पाटलाच्या मुसक्या बांधून त्याला इथपर्यंत घेऊन यावे.

समर्थांनी पडल्या-पडल्याच राजांना विचारले, "शिवबा, कुणास बोलावणे पाठवित आहात ?"

राजे म्हणाले, "देगावच्या पाटलांना."

समर्थ म्हणाले, "आम्ही सांगू ती शिक्षा करणार असाल तर बोलवा पाटलांना."

राजे म्हणाले, "यात संशय कशाला पाहिजे! समर्थ सांगतील ती शिक्षा करतो."

समर्थांनी आपल्या पायाची शपथ वाहून घेतली. नंतर ढालाइतास सांगितले, "मारहाण न करता देगावच्या पाटलाला येथपर्यंत घेऊन येणे."

त्याप्रमाणे ढालाइताने जाऊन पाटलाला आणून

(पान ३६ वर)



राजानंद पिंपळकर

कथा

# मानवतेचं झाड

उन्हाळ्याची सुट्टी संपून नुकतीच आराधनाची शाळा चालू झाली होती. वडिलांची नोकरी फिरतीची असल्यामुळे सतत दोन वर्षांनी तिची शाळा बदलायची. नवीन शाळा, नवे वर्ग, नव्या बाई, मित्र मैत्रिणीसुध्दा नवे, सगळेच नवे चेहरे पाहून ती नेहमीच गोंधळून जायची. लहानपणापासूनच तशी ती फार हुशार; पण सततच्या या बदलामुळे स्वभावाने थोडी मितभाषी आणि बुजरी झाली होती. नव्या शाळेत कुणी जीवाभावाच्या मैत्रिणी नाहीत, घरी आलेल्या कुणा नातेवाईकांशी बोलणे नाही, की आपलेपणाने कुणा मित्रांकडे खेळायलाही जाणे नाही. ती, तिची आई आणि वडील आणि शाळा एवढंच तिचं विश्व. त्यामुळे तिच्या आईला तिची खूप काळजी वाटायची.

नव्या शाळेत शिकता शिकता त्या शाळेच्या बाई तिला फार आवडू लागल्या. बाईंना आराधनाची अडचण चांगलीच समजली होती. त्यामुळे त्या तिच्याकडे अधिक लक्ष देत होत्या. असाच एकदा शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम होता. सगळ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या आवारात एक छानसं झाड लावण्याची संधी मिळणार होती.

आराधना निसर्गप्रेमी असल्यामुळे तिला झाडे, वेली, रंगीबेरंगी फुले यांचं फार आकर्षण होतं. घरात



वडिलांनी फुलवलेल्या छोटेखानी बागेत ती तासन्तास रमायची, एखाद्या नवीन फुलाबद्दल आईकडून माहिती मिळवायची.

वृक्षारोपणाच्या दिवशी तिच्या हातात बाईंनी पानफुटीचं झाड दिलं. तिने यापूर्वी ते कधीच पाहिलं नव्हतं. ते झाड पाहून तिला खूप आनंद झाला. किती वेगळं आणि नावीन्यपूर्ण झाड होतं ते. त्या झाडाबद्दल अधिक माहिती मिळवण्याच्या उत्कंठेने तिने बाईंना अनेक प्रश्न विचारले. बाईंनीही साऱ्या प्रश्नांची तिला उत्तरे दिली आणि म्हणाल्या, 'प्रत्येक झाड, त्या झाडाचं प्रत्येक पान हे वेगळं आहे. प्रत्येकाला आपला आकार आहे, रंग आहे, गंध आहे. आता या पानफुटीच्या झाडाचं पान एकमेकाला लागून उगवतं, परस्परांना आधार देतं. आपल्या वर्गातल्या मित्र मैत्रिणींचं, आजूबाजूच्या लोकांचंही असंच असतं. प्रत्येक व्यक्ती वेगळी आहे, प्रत्येकाचा आपला स्वभाव आहे. आपण सगळ्यांशी मैत्री केली पाहिजे, सगळ्यांना आपलंसं करुन घेतलं पाहिजे.'

आराधनाला हे सगळं पटलं, तेव्हा तिने वर्ष संपायच्या आत सगळ्यांशी मैत्री केली आणि जेव्हा वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला तेव्हा तिचं कौतुक करायलाही सगळ्या वर्गाने टाळ्यांचा गजरात तिचं अभिनंदन केलं.

म्हणूनच मित्रहो, सगळ्यांशी मैत्री करा, सगळ्यांना आपलसं करा आणि आयुष्य सोपं करा.

- अनुप अनिल साळगांवकर
दादर, मुंबई

❖❖❖

# देगावच्या पाटलाला शिक्षा

(पान ३४ वरुन)

कचेरीत उभे केले. समर्थ उच्च सिंहासनावर बसले आहेत, अशा वेळी पाटील दरबारामध्ये येऊन दाखल झाला. आपण ज्याला मारले ते राजगुरु रामदासस्वामी होते अशी खबर त्याला लागली होती. आता तो गोसावी प्रत्यक्ष सिंहासनावर पाहिल्यावर मग त्या बिचाऱ्याची दशा काय विचारावी? तो भीतीने लटालटा कापू लागला. त्याने समर्थांच्या पायांवर लोळण घेतली व ओक्साबोक्शी रडू लागला. त्यावर "तुझं शेत चांगलं पिकेल," असा समर्थांनी आशीर्वाद देऊन उठविले व शिवाजीमहाराजांचे पाय धरायला सांगितले. त्याप्रमाणे त्याने उठून महाराजांचे पाय धरले. समर्थांनी त्याला क्षमा करायला सांगून ते शेत त्याला इनाम करुन द्यावे व त्याला पोशाख देऊन निरोप द्यावा, अशी आज्ञा केली. ही आज्ञा ऐकून लोकांना अत्यंत कौतुक वाटले. खरंच आहे, उपकार करणारावर अपकार करणारे पुष्कळ लोक आढळतील; परंतु अपकार करणारावर उपकार करणारा साधू परम धन्य होय. तेच समर्थांनी खरे करुन दाखविले.

समर्थांची आज्ञा म्हटली, की राजे शिरसावंद्य करणारच. मग ही तरी अमान्य कशी होणार? त्यांनी तात्काळ त्या पाटलाला 'क्षमा केली,' असे म्हणून उठविले. त्याचे शेत त्याला इनाम करुन दिले व शेलापागोटे देऊन त्याला निरोप दिला. हे इनाम करुन दिलेले शेत अद्याप त्याच्या वंशाकडे आहे. केवढे हे औदार्य! अशा सत्पुरुषाला लोकांनी देवाप्रमाणे मानल्यास त्यात आश्चर्य ते कोणते?

क्रमशः

❖❖❖





तेजस्विनी - ८८

# विश्वविक्रमी - आरोही पंडित

मूळची मुंबईतील बोरीवली उपनगरातील असणारी आरोही पंडित दोन दिवसांपूर्वी, म्हणजे १३ व १४ मेच्या मध्यरात्री कॅनडातील इकालुइट विमानतळावर उतरली, तेव्हा तिने एकापेक्षा अधिक विक्रम केले होते. आपल्या छोट्याश्या एक इंजिनाच्या चारशे किलोपेक्षा कमी वजनाच्या सेन्सस ९१२ या स्पोर्ट्स विमानातून तिने स्कॉटलंडमधून उड्डाण केले तेव्हा हा विक्रम तिच्या निकट आला खरा, पण तो सोपा नव्हता. पुढील तीन हजार किलोमीटरचा प्रवास खडतर, अवघड आणि प्रतिकूल होता. आणि ती यशस्वीपणे कॅनडात उतरली, तेव्हा ती ही अभूतपूर्व कामगिरी एकटीने पूर्ण करुन अटलांटिक महासागराला पार करणारी जगातील पहिली महिला ठरली. शिवाय, तिच्या नावावर अन्य काही विक्रम नोंदले गेले. अवघी २३ वर्षांची असलेली आरोही पायलट आहे. तिची जिवलग मैत्रीण आणि सहकारी पायलट किथर मिस्किटा यांनी एकत्रितपणे या विक्रमी मोहिमेवर जाण्याचा निर्णय घेतला. आइसलँड व ग्रीनलँड येथे अल्पकाळ थांब्यानिशी पाच टप्प्यातून तिचा प्रवास झाला. त्यामुळे भारतातून ग्रीनलँडला लाइट स्पोर्ट विमान उड्डाण करणारी जगातील पहिली महिला असाही विक्रम तिच्या नावे नोंदला गेला. शिवाय, ग्रीनलँडच्या खडतर बर्फाळ डोंगरटोकावरुन यशस्वी उड्डाण करण्याचा विक्रमही तिच्या नावावर झाला, कारण तसे करणारी ती जगातील पहिली पायलट बनली. या मोहिमेसाठी आरोही व किथरने सात महिन्यांचे कठोर प्रशिक्षण पूर्ण केले. कठीण परिस्थितीत तग धरण्याची तयारी, शारीरिक दमसास आणि मानसिक सक्षमता हे सारेच तपासणे आवश्यक असते. भारतातून दोघींनी मोहिमेस प्रारंभ केला. ब्रिटनच्या पुढचा प्रवास आरोहीने एकटीने केला. तिचा हा एकंदर ३७ हजार किलोमीटरचा प्रवास मुंबईत जुलैमध्ये पूर्ण होईल, तेव्हा तिच्या शिरपेचात अनेक नव्या विक्रमांचे तुरे खोवलेले असतील.

(साभार म.टा.)

❖❖❖






# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा







झाडापासून आम्हाला सावली मिळते.
झाडापासून आमच्या आरोग्यासाठी लाभदायक फळे मिळतात.
झाडापासून भाज्या मिळतात.


सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आम्हाला जिवंत राहण्यासाठी लागणारा ऑक्सिजन देतात.
ही पाऊस पाडण्यासाठी मदत करतात.
ही पुरातील पाण्याच्या वेगापासून आम्हाला वाचवतात.



अशा बऱ्याचशा कामासाठी झाडे आमच्या कामी येतात.
मग आम्ही झाडे तोडून मृत्यूला का ओढून घ्यावे.
म्हणून आपण सर्वांनी झाडे लावू या, झाडे जगवू या आणि जीवन सुखद करु या.





स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेष

# १५ ऑगस्ट

आपल्या प्रिय भारत देशाला इंग्रजी राजवटीच्या पारतंत्र्यातून १५ ऑगस्ट १९४७ला स्वातंत्र्याच्या पावित्र्याचे श्रेय मिळाले. १९४७ हे साल म्हणजे ऐतिहासिक साल होय. या ऐतिहासिक सालाच्या पवित्र घटनांच्या पावन स्मृती आपण कायम ठेवल्याच पाहिजेत आणि म्हणून कर्तव्य बुद्धीने आपण दरवर्षी १५ ऑगस्टला 'स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करतो.

माणूस असो वा देश असो स्वातंत्र्यासारखे दुसरे सुख नाही. हे जाणूनच भारतीय स्वातंत्र्यासाठी अनेकांनी आपले प्राण पणाला लावून प्रयत्न केले. या प्रयत्नाचे प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे असले तरी त्यामागचे ध्येय एकच होते आणि ते म्हणजे भारताचे स्वातंत्र्य! इंग्रजांनी दीडशे वर्ष भारतात राज्य केले. तेवढ्या काळात आमचा इतिहास, आमचा पराक्रम, आमचा स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम त्यांनी केले. भारतात शिक्षणाचा प्रचार करण्याचा देखावा निर्माण करुन भारतीय तरुणांना पोटभरु कारकून बनविणे एवढीच त्या शिक्षणाची मर्यादा होती. तलम कापडाचे आकर्षण निर्माण करुन आमच्या शेतकऱ्यांना लुबाडले. स्वत:च्या मालकीच्या चहाच्या मळ्यांची भरभराट साधण्यासाठी भारतीयांना चहाचे व्यसन लावले. अशा अनेक प्रकारे भारतीयांना लुबाडले.

इंग्रजांचा कावेबाजपणा ओळखणाऱ्या काहींनी त्यांच्या विरुद्ध शस्त्र उगारले. १८५७ चे स्वातंत्र्यसमर तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे यांनी गाजविले. पुढे सशस्त्र उठाव करुन वासुदेव बळवंत फडके, क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू इत्यादिंनी आपला निषेध शस्त्रांद्वारे नोंदविला. काहींनी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या केली. स्वातंत्र्यवीर सावरकर, धिंग्रा यांनी तसेच प्रयत्न केले. लोकजागृती झाली, पण ती दडपली गेली. रानडे, गोखले, आगरकर यांनी लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य वापरुन इंग्रजांकडून होणारा अन्याय व जुलूम यांची जनतेला जाणीव करुन दिली. भारतीय समाजाला आपली स्थिती सुधारण्याची प्रेरणा, जाणीव करुन दिली. फुले, इ.च्या शिकवणीने जातीय भेदाभेद किती वाईट आहे व त्याने समाज कसा दुर्बल होतो हे लोक शिकले.

कित्येक क्रांतीकारी फासावर गेले. टिळकांनी, सावरकरांनी आणि अशा अनेक क्रांतीवीरांनी तुरुंगवासातच उमेद घालविली. परंतु इंग्रजांनी यावर अधिकार पदे, मोठमोठ्या पदव्या, हक्क नसलेल्या कमिट्या यांच्या उपायांनी भारतातील जनतेत फूट निर्माण केली. फोडा आणि झोडा हे त्यांनी त्यांची सत्ता कायम ठेवण्यासाठी वापरलेले तंत्र होते. पुढे महात्मा गांधींकडे देशाचे नेतृत्व आल्यावर पूर्वीच्या प्रयत्नांचा उपयोग होत नाही, असे पाहून सत्याग्रहाच्या व अहिंसेच्या मार्गाने जाण्याचा संदेश त्यांनी जनतेला दिला. त्याबरोबरच स्वदेशी, स्वावलंबन, असहकार



अशा मार्गांनी सर्वत्र भारतीयांना इंग्रजांविरुद्ध आंदोलन करायला शिकविले. सरकारी जुलमी कायदे, अन्याय, नोकऱ्यांविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम सुरु केली. गांधीजींना जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद इत्यादिंनी सहकार्य केले. सुभाषचंद्र बोस यांनी मोठ्या धाडसाने इंग्रजांच्या विरोधात 'आझाद हिंद फौज' उभी केली.

अशा प्रकारे अनेकांकडून भिन्न भिन्न मार्गाने व अनेकांच्या बलिदानाने हे स्वतंत्र्य मिळविले गेले आहे. आपल्या पिढीचा स्वतंत्र भारतात जन्म झाला आहे. आता भारताचे स्वातंत्र्य टिकविण्याचे काम आपल्याला करायचे आहे ते केलेच पाहिजे! त्यासाठी १५ ऑगस्ट हा दिवस आपण पवित्र सणासारखा साजरा केला पहिजे. आजच्या दिवशी आपण काही चांगले निश्चय करुन देशहिताचे काम करायची शपथ घेतली पाहिजे. ध्वजवंदन करताना त्या पवित्र ध्वजाच्या साक्षीने ही शपथ घ्यायची असते.

या दिवशी ध्वज फडकविल्यानंतर 'जन-गण-मन' हे राष्ट्रगीत म्हणून नंतर सर्वांनी 'सावधान'तेच्या पावित्र्यात 'झेंडा उंचा रहे हमारा' हे गीत सामुदायिकपणे म्हणायचे असते. देशासाठी प्राण पणाला लावलेल्या क्रांतीवीरांची आठवण करुन देणारे हे गीत म्हणजे -

ए मेरे वतन के लोगों, जरा आख में भर लो पानी।
जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुर्बानी।।

स्वरसाम्राज्ञी लतादीदींच्या स्वरातील हे गीत ऐकल्यानंतर खरचं त्या क्रांतीवीरांसाठी आपल्या भावनांना पाझर फुटतो... त्यांना आम्हा सर्वांचे शत शत प्रणाम!

– आतिश चंद्रकांत शिंदे, ठाणे

❖❖❖

# मुक्ती पर्व



(चाल : मागतो मी पांडुरंगा)

सदा अनुसरण तयांचे राहो मनी ध्यानी
मुक्ती पथा जोडियले ज्या थोर महात्म्यांनी ।।ध्रु।।

मुक्त होऊनिया राहावा, अखंड संसार
जगाच्या सुखाचा केला, तयांनी विचार
प्रतिकार परनिंदेचा, भार सावरोनी ।।१।।

बूटा शहनशाहजींचे थोर उपकार
गुरबचन प्रतापजींनी सोशिले प्रहार
तुम्हां आम्हांसाठी दिधली, त्यांनी कुरबानी।।२।।

चालू तयांच्या मार्गाने, ठेऊ विश्वास
आहे मुक्ती पर्वामागे, थोर हा संदेश
सुरेशा नको तू विसरु त्यांच्या आठवणी ।।३।।

- सुरेश तिर्लोटकर







# वाशीम

वाशीम जिल्हयाचे प्राचीन नाव वत्सगुल्म होते. पूर्वी ही वाकाटकांची राजधानी होती. १ जुलै १९९८ रोजी विभाजन होऊन अकोला व वाशीम हे दोन जिल्हे तयार झाले.

प्रशासकीय विभाग – अमरावती

तालुके – ६ – कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसाड, वाशीम तालुका

सीमापूर्वेस – यवतमाळ,

उत्तरेस – अकोला,

ईशान्येस – अमरावती

पश्चिमेस – बुलढाणा

दक्षिणेस – हिंगोली

२०११ जनगणनेनुसार

क्षेत्रफळ – ५१५३ चौ. किमी.

लोकसंख्या – ११९७१६०

घनता – २४४

साक्षरता – ८३.२५ %

लिंग गुणोत्तर – ९३०

भूगोल –

पैनगंगा – ही जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. कास ही तिची मुख्य उपनदी आहे. कास नदी पैनगंगेस शेलगाव राजगुरे या गावापासून १ किलोमीटरवर मिळते.

अडाण नदी वाशीम तालुक्यात उगम पावते आणि मंगरुळपीर व मानोरा तालुक्यातून वाहते. वाशीम हे खांडवा – पूर्णा रेल्वेमार्गावरील एक स्थानक आहे.

जिल्ह्यातील मुख्य पिके – सोयाबीन, गहू, ज्वारी, बाजरी, तूर व कापूस ही आहेत.

पर्यटन स्थळे –

रिसोड तालुका – श्री संत अमरदास बाबा मंदिर ऋषीवट, श्री पिंगळाशी देवी, श्री सितला मंदिर, आप्पास्वामी मंदिर (रिसोड).

वाशीम – बालाजी मंदिर

कारंजा – श्री क्षेत्र पोहरादेवी, पद्मतीर्थ शिवमंदिर, अंतरीक्ष पार्श्वनाथ जैन मंदिर, नृसिंह सरस्वती मंदिर (लोणी), चामुंडा देवी.

कांरजा लाड – ( अक्षांश २० ओ २९२ उत्तर रेखांश ७७ ओ २९२ पूर्व) हे महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यातील नगरपरिषद असलेले एक शहर आहे. या अत्यंत प्राचीन असलेल्या नगरीचे माहात्म्य



स्कंदपुराणातील पातालखंडात आले आहे. करंज ऋषीवरुनच या नगरीला करंजपूर हे नाव मिळाले असे म्हणतात. करंजपूर चे कार्यरंजकपूर, आणि नंतर कारंजा झाले. या नगरीत जैन लाड समाजाची वस्ती असल्याने 'कारंजा लाड' असा या गावचा उल्लेख केला जातो.

रिसोड - हे एक पौराणिक गाव/शहर आहे. रिसोडचे मूळ नाव ऋषिवट असे आहे. असे म्हणतात की रिसोड परिसरात पुराणकाळी असंख्य वडाची झाडे होती. तिथे ऋषिमुनी तपस्या करीत असत. रामायणात उल्लेख असणारा दंडकारण्याचा हा भाग आहे. संतांची भूमि म्हणुन रिसोडची ख्याती पूर्वीपासून आहे. त्या ठिकाणी अनेक महादेवाची प्राचीन मंदिरे आहेत अजूनही या परिसात उत्खननात महादेवाच्या पिंडी सापडतात. रंगारी लोकांचे शहर म्हणूनसुध्दा रिसोड ची ख्याती होती. रिसोड हे तलावांचे गाव म्हणून प्रसिद्ध होते. या तलावांमुळे रिसोडला नेहमीच लष्करे आपले तळ ठोकून असत. १७२४ साली येथील रहिवाशांनी हे तलाव नष्ट केले, तरीहि आजतागायत पिंगलाक्षी देवी तलाव अस्तित्वात आहे. रिसोड क्षेत्र लखूजी जाधवांना मिळाल्यावर काझी खानाने रिसोड वर मोठा दरोडा घालून हा परगणा लुटला होता १८५७ च्या दरम्यान पेंढारे व रोहिल्यांनीही रिसोडवर दरोडे घातले होते. मात्र त्यांना रहिवाशांनी एकत्रितपणे हुसकाऊन लावल्याचे उल्लेख आहेत. १९२८ सालच्या (वर्ग ८ ते १०) इंग्रजी शासनाच्या भूगोलाच्या पुस्तकात रंगारी लोकांचे गाव असे रिसोडचे वर्णन आहे असे १९२८ साली इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या एका दिवंगत व्यक्तीने काही शिक्षकांना सांगितले होते.

❖❖❖

कवीता



# रक्षाबंधन

प्रेम बंधू भगिनींचं आहे अतूट जयात
या रेशमी धाग्यात एक रेशमी हे नातं ।।ध्रु।।

लाडकी बहीण भावाची पाहते अशी वाट
येणार कधी भाऊ बांधीन प्रेम गाठ
निस्सिम असे हे प्रेम भरले असे जयात ।।१।।

रांगोळी काढून छान मांडीला तयावर पाट
ओवाळी आरती प्रेमे घेवोनी करी ताट
मन आनंदून गेले तेवती निरंजनी वात ।।२।।

राहू दे अखंड सुखी लाडका भाऊ राया
मागणे मागते मी तुजपाशी प्रभू राया
नि:स्वार्थ हे प्रेम असे नाही दुजे जगात ।।३।।

वर्षानुवर्षे ऐसा दिन नित्यनेम यावा
ही तार अंतरीची जोडील दोन जीवा
सामर्थ्य सुरेशा ऐसे या राखी बंधनात ।।४।।

- सुरेश तिर्लोटकर



# सामान्य ज्ञान



१) १३ ऑगस्ट हा दिवस कोणता दिन म्हणून साजरा करतात ?
अ) सद्‌भावना दिन  ब) अवयवदान दिन  क) ऑगस्ट क्रांतिदिन  ड) स्वातंत्र दिन

२) 'हिमरु' शालींसाठी प्रसिध्द असलेले ठिकाण काणते ?
अ) औरंगाबाद  ब) सोलापूर  क) इचलकरंजी  ड) पैठण

३) महाराष्ट्रात न सापडणारे खनिज कोणते ?
अ) लोखंड  ब) सोने  क) तांबे  ड) जस्त

४) १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन कोणता नवीन जिल्हा निर्माण केला गेला ?
अ) चंद्रपूर  ब) परभणी  क) लातूर  ड) बीड

५) राष्ट्रीय क्रीडा दिन कोणत्या खेळाडूच्या जन्मदिनानिमित्त साजरा होतो ?
अ) दारासिंग  ब) मेजर ध्यानचंद  क) रणजित सिंह  ड) सुनील गावस्कर

६) महाराष्ट्रात सर्वाधिक लोकसंख्येची घनता असणारा जिल्हा कोणता ?
अ) बृहन्मुंबई  ब) ठाणे  क) पुणे  ड) नागपूर

७) शून्य या अंकाचा शोध प्रथम कोणत्या देशात लागला ?
अ) जर्मनी  ब) जपान  क) चीन  ड) भारत

८) खालीलपैकी कोणती व्यक्तीरेखा महाभारतातील नाही ?
अ) सैरंध्री  ब) गांधारी  क) श्रुतकीर्ती  ड) भानुमती

९) इस्त्रो (भारतीय अवकाश संशोधन संस्था) कोणते यान प्रक्षेपित करणार आहे ?
अ) गगनयान  ब) चांद्रयान  क) सूर्ययान  ड) वायुयान

१०) कोणत्या प्रकारचा भक्त परमात्म्याला जाऊन मिळतो ?
अ) आर्त  ब) अर्थार्थी  क) जिज्ञासू  ड) ज्ञानी

उत्तरे इतरत्र





# गोंडस गोजिरा अटलांटिक पुफिन

अटलांटिक पुफिन समुद्रकिनारी आढळणारा पक्षी आहे. तो उडतोसुध्दा आणि पाण्यावर तरंगतोसुध्दा. तरंगताना तो आपल्या पंखांचा वापर वल्ह्यांसारखा करीत असतो. हा पक्षी छोटे छोटे मासे खात असतो. उदाहरणार्थ वाळूत आढळणारे ईल व हिलसा मासे. सामान्यत: तो पाण्याखाली ३० सेकंद वा त्यापेक्षा कमी काळच राहू शकतो. परंतु गरज पडल्यास तो एक मिनिटही पाण्याखाली राहू शकतो. पुफिन पाण्यात २०० फूट खोल बुडी मारु शकतो. तसेच तो खूप वेगात उडू शकतो.

दरवर्षी उन्हाळ्यात हजारो पुफिन उत्तर अटलांटिक किनाऱ्यावर गोळा होतात. पुफिन आपली घरटी सरळ उभ्या उतरणीच्या खडकांत तयार करतात. जेथे त्यांची अंडी सुरक्षित राहू शकतात. घरटे बनविण्यासाठी नर व मादी दोघेही आपल्या चोचीने खड्डा खणतात व त्याभोवतीचा कचरा हटवतात.

पुफिन स्वत: मासे खाताना मासे जमिनीतून काढून गिळून टाकतात, पण पिल्लांना देण्यासाठी एक मासा चोचीत पकडून घरट्याकडे नेत असतात व पिल्लांच्या चोचीत भरवत असतात. बऱ्याचदा घरट्यापर्यंत ते पोचण्यापूर्वीच हेरिंग मासे त्यांच्या चोचीतला मासा पळवीत असतात. अटलांटिक पुफिन काळ्या-पांढऱ्या रंगांचे असतात. यांच्या अनेक प्रजाती लाल निळ्या व पिवळ्या रंगांतही आढळतात. यांचे पाय नारंगी रंगांचे असतात. नर व मादी एकसारखेच दिसत असतात. अटलांटिक पुफिनना सागरी पोपटही म्हणतात. हिवाळ्यात पुफिनची रंगीत चोच फिकी पडते, पण यांच्या पंखांची चमक वाढत जाते. यांच्या चोचीचा आकारही वाढतो. अटलांटिक पुफिन अटलांटिक सागरात आढळणारी एकमेव जात आहे. प्रशांत महासागरात पुफिनच्या आणखीन तीन जाती आढळतात. आटलांटिक जातीत सर्वांत छोटे पुफिन आहेत. पुफिनची मुख्यत्वे काळ्या रंगांचे गुल शिकार करतात.

संग्राहक - अंकित जाधव





# बोले तैसा चाले.....

सोमपूर नावाच्या गावात ढवळे गुरुजींची बदली झाली. ते खूप प्रामाणिक आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत अशी त्यांची ख्याती होती. एकदा ते कामानिमित्त तालुक्याच्या गावी बसने निघाले होते. त्यांनी कंडक्टरला पैसे दिले आणि ते आपल्या जागेवर जाऊन बसले.

कंडक्टरने तिकिटाचे पैसे घेतले व उरलेली रक्कम गुरुजींना परत केली. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की त्यात १० रुपये जास्त आले आहेत. त्यांनी विचार केला की आता कंडक्टर घाईत आहे तेव्हा थोड्या वेळाने पैसे परत करु या. काही वेळ झाला तरी कंडक्टर अजूनही त्याचे तिकिटे देण्याचे काम करतच होता.

गुरुजींच्या मनात एक विचार आला की आता तर कंडक्टर इतका घाईत आहे की त्याला ते १० रुपये परत केले काय आणि नाही केले काय, काय फरक पडणार आहे? लाखो रुपयांचे व्यवहार करणाऱ्या कंपनीकडून हे १० रुपये भेट मिळाले असेच आपण समजू आणि याचा काही तरी सदुपयोग करु, एखाद्या गरीब मुलाला वही किंवा पेन घेऊन देऊ.

गुरुजींच्या मनात असे विचार चालू असतानाच त्यांचे उतरायचे ठिकाण आले. बसमधून उतरताना अचानक त्यांचा हात खिशाकडे गेला व त्यातून ती दहा रुपयाची नोट त्यांनी बाहेर काढली व कंडक्टरला परत



दिली व म्हणाले, “भाऊ...!! तुम्ही मघाशी मला तिकिटाचे पैसे परत करताना घाईगडबडीत हे दहा रुपये जास्त दिले आहेत.”

कंडक्टर हसून म्हणाला, “गुरुजी! तुम्हीच या गावात नवीन शिक्षक म्हणून आलात ना? तुमच्याबद्दल मी खूप ऐकले होते. तुम्ही मुलांना सन्मार्ग शिकवता तेव्हा माझ्या मनात आले तुम्ही जसे मुलांना सद्विचार सांगता. तसे तुम्ही वागता का? हे पाहण्याची खूप इच्छा होती. तुम्हाला बसमध्ये चढताना पाहिले आणि मनात एक विचार आला, की चला, बोलता तसे वागता का? मुलांना उपदेश करता ते आचरणात आणता का? याचा पडताळा घ्यावा म्हणून मी ते दहा रुपये तुम्हाला मुद्दाम जास्त दिले होते; पण मला आता कळून चुकलं की तुम्ही जसं बोलता तसंच तुमचं पवित्र आचरण आहे. गुरुजी मला क्षमा करा.” एवढे बोलून कंडक्टरने त्यांचे पाय धरले.

गुरुजींना आता घाम फुटला होता, ते घाम पुसत मनात म्हणाले, “प्रभो, तुझी लीला अपरंपार आहे, दहा रुपयांचा मोह मला आता किती महागात पडू शकला असता पण मला त्यातून वाचवलंस, देवा तू खरंच दयाळू आहेस.”

मित्रांनो, गुरुजींनी चुकीच्या मार्गाने मिळवलेल्या त्या १० रुपयांचा जरी गरीब विद्यार्थ्यासाठी वही किंवा पेन घेऊन सदुपयोग केला असता तरी कंडक्टरच्या मनात मात्र हेच आले असते, की गुरुजी अप्रामाणिक आहेत. जसे बोलतात तसे चालत नाही. त्यांच्या कीर्तीला काळिमा लागला असता; पण त्यांना असलेली प्रामाणिकपणाची सवय ही त्या मोहावर मात करुन गेली आणि नकळत त्यांनी ते १० रुपये कंडक्टरला परत केले. म्हणून नेहमी चांगल्या सवयी जर अंगी बाणवल्या तर चूक करायची असं ठरवून देखील आपण चूक करु शकत नाही.

❖❖❖

कवीता



# हसती दुनिया - अंतरंग


दोन शब्दात दडला अर्थ
नका घालवू जीवन व्यर्थ
शब्दकोड्यानं विकसली बुध्दी
करा ब्रह्मज्ञानानं आत्म शुध्दी
विचार पुष्पानं भारलं मन
द्या सद्गुरुला तन मन धन
दिव्य वाणीत स्थिरावलं मन
माना सद्गुरुचे पाच प्रण
तेजस्विनीची शौर्य गाथा
देई प्रेरणा नारी जगता
सुंदर चित्रानं आकर्षीली नजर
सद्गुरुची आपल्यावर मेहर नजर
सामान्य ज्ञानात ज्ञान भरलं
सत्संग सेवेने जीवन तरलं

– सिताबाई बळीराम भोसले
किल्लारी

❖❖❖



# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) अ
३) ब
४) क
५) ब
६) अ
७) ड
८) क
९) अ
१०) ड

## शब्दकोडे ९८९

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ए | २ को | णी | ३ स | | ४ अ | ब्ज |
| | हि | | ५ त | क्ष | क | |
| ६ हि | मा | च | ल | | ७ ब | र्फ |
| र | | | ८ ज | ९ ठ | र | |
| १० वा | ११ शि | म | | का | | १२ कुं |
| | लाँ | | १३ ना | स | १४ प | ती |
| १५ ना | ग | पू | र | | व | |
| त | | | १६ द | शा | न | न |



।। १ तू ही निरंकार ।।

कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।
कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।
कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।
कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।




शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है । गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है ।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं । गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं ।

सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

